रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २२५ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹


## शिवसेनेबाबत आजपासून सुनावणी

**मुंबई :** शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हावरून सुरू असलेल्या वादावर सर्वोच्च न्यायालयात उद्या बुधवारपासून अंतिम सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर सलग दोन दिवस दोन्ही गटांचा अंतिम युक्तिवाद ऐकून घेतला जाणार आहे. या प्रकरणात ठाकरे गट आणि शिंदे गट आमनेसामने आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने २०२३ मध्ये एकनाथ शिंदे गटाला 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.




## राजकीय फेरफटका

ग्रामीण भागाच्या विकासाचे प्रमुख केंद्र असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील जिल्हा परिषद मतदारसंघ पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या प्रश्नांवर नागरिकांचा असलेला असंतोष, तसेच पावणेचार वर्षांपासून रखडलेली किंवा अपूर्ण राहिलेली विकासकामे या सगळ्यांमुळे हा जिल्हा परिषद मतदारसंघ सध्या निर्णायक वळणावर उभा आहे. 'राजकीय फेरफटका' या सदरामध्ये 'कृषीवल'मध्ये जिल्हा परिषद मतदारसंघातील वास्तव परिस्थिती, स्थानिक समस्यांचे राजकीय गणित, विकासकामांमागील दावे आणि प्रत्यक्षात दिसणारे चित्र, तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या हालचाली यांचा सखोल आणि परखड आढावा घेतला जाणार आहे. नागरिकांचे प्रश्न, सत्ताधाऱ्यांची जबाबदारी या सर्वांचा वेध घेत 'कृषीवल'मधील राजकीय फेरफटका जनतेच्या अपेक्षांचे प्रतिबिंब मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

ग्रामीण विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उभे राहावे, अशी स्थिती आज जिल्हा परिषद मतदारसंघात दिसून येत आहे. पिण्याच्या पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न, खड्डेमय रस्ते, निकृष्ट दर्जाची विकासकामे, आरोग्य आणि शिक्षण सुविधांची दयनीय अवस्था, तसेच रोजगाराच्या संधींचा अभाव या मूलभूत प्रश्नांनी नागरिकांचे दैनंदिन जगणे कठीण बनले आहे. मात्र, निवडणुका जवळ आल्या की सत्ताधारी लोकप्रतिनिधींकडून विकासाचे गाजर दाखवले जाते आणि मतदारसंघ पुन्हा विस्मरणात जातो. एका बाजूला कोट्यवधींच्या निधीचे दावे, उद्घाटनांचे फलक आणि कागदावर पूर्ण झालेली कामे; तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात अपूर्ण, निकृष्ट किंवा अस्तित्वातच नसलेली विकासकामे हा विरोधाभास 'कृषीवल'च्या विकासनकाशावर ठळकपणे जाणवतो. लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ठेकेदार यांच्यातील साटेलोटे असल्याच्या तक्रारी, तसेच निधीच्या वाटपात होणारा भेदभाव यामुळे 'विकास' हा शब्दच नागरिकांसाठी उपहासाचा विषय ठरत चालला आहे.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद मतदारसंघ राजकीयदृष्ट्या अधिक तापलेला आहे. 'राजकीय फेरफटका' या सदरामध्ये कृषीवल जिल्हा परिषद मतदारसंघातील जमिनीवरचे वास्तव, विकासाच्या दाव्यांमागील सत्य, प्रशासकीय दुर्लक्ष, राजकीय जबाबदारीचे अपयश आणि नागरिकांच्या अपेक्षा यांचा परखड, निर्भीड आणि तथ्याधारित आढावा घेतला जाणार आहे. हा फेरफटका केवळ राजकीय घडामोडींचा नव्हे, तर दुर्लक्षित जनतेच्या आवाजाचा आणि प्रश्नांचा आरसा ठरणार आहे.

सध्या पाहिले तर निवडणुका जवळ येताच अचानक कामांना वेग आला आहे. आश्वासनांची खैरात सुरू झाली आणि मतदारांना पुन्हा एकदा फसवण्याची तयारी सत्ताधाऱ्यांकडून केली जात आहे. मात्र, यावेळी जनता शांत बसणार आहे का, हा खरा प्रश्न आहे.

लोकप्रतिनिधींची विकासाच्या नावाखाली सुरू असलेली राजकीय खेळी, प्रशासनाची उदासीनता आणि लोकप्रतिनिधींच्या अपयशाचा निर्भीड उलगडा केला जाणार आहे. हा फेरफटका केवळ राजकीय विश्लेषण न राहता, सत्ताधाऱ्यांना आरसा दाखवणारा आणि जनतेच्या संतापाचा आवाज ठरणार आहे.






## वेधक

### शेअर बाजार कोसळला

**मुंबई :** शेअर बाजारात या आठवड्याची सुरुवात मंदीनेच झाली आहे. वाढत्या जागतिक अस्थिरतेमुळे आठवड्याच्या पहिल्याच दिवशी समोवारी बाजारात मोठी घसरण दिसून आली. बाजारात मंगळवारीही घसरणीचे सत्र सुरूच राहिले असून, शेअर बाजाराची धूळधाण झाली आहे. या घसरणीमुळे अनेक गुंतवणूकदारांची दाणादाण उडाली आहे. या घसरणीत गुंतवणूकदारांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. मंगळवारी मुंबई शेअर बाजाराची निर्देशांक सेन्सेक्स व्यवहार बंद होताना ११८५ अंकांवर होता. तर निफ्टी ४०० अंकांनी घसरला होता.

### डॉलरपुढे रुपया घसरला

**नवी दिल्ली :** जागतिक आर्थिक आणि जागतिक राजकीय संघर्ष यामुळे रुपयाचे दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. मात्र, जगभरातील युद्धजन्य परिस्थिती, जागतील राजकीय तणाव आणि कठोर अमेरिकन व्यापार धोरणे सध्या बाजारावर दबाव आणत आहेत. त्याचा परिणाम म्हणून रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९१ पर्यंत घसरला आहे. तज्ज्ञांच्या मते, यावर्षी रुपया प्रतिडॉलर ९० ते ९२ च्या श्रेणीत राहू शकतो. आगामी काळात डॉलरच्या तुलनेत रुपया ८६ ते ८८ च्या दरम्यान मजबूत होऊ शकतो, असेही काही तज्ज्ञांचे मत आहे.

### पानसरे हत्या प्रकरणातील आरोपीचा मृत्यू

**पुणे :** कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील संशयित आरोपी समीर विष्णू गायकवाड (४५, रा. सांगली, विकास चौक) याचा मंगळवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मृत्यू झाला. सोमवारी रात्री अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने त्याला तातडीने सांगलीतील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना मंगळवारी सकाळी त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. समीर गायकवाड हा सध्या पॅरोलवर बाहेर होता. त्याला प्रत्येक रविवारी विश्रामबाग पोलीस ठाण्यात हजरी होती. जामिनावर बाहेर असल्यापासून तो पत्नीसह सांगलीतील विकास चौक परिसरातील घरात राहात होता. रविवारी रात्री अचानक छातीत दुखू लागल्याने त्याला सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

## जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

# 'महाविकास'चे शक्तीप्रदर्शन



- उमेदवारांनी घेतले जयंत पाटील यांचे आशीर्वाद
- अलिबागमध्ये शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती



### उमेदवारी अर्जांच्या गर्दीने प्रशासनाची तारांबळ

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत २१ जानेवारी असून, मंगळवारी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी एकाच वेळी अर्ज दाखल केल्याने तहसील कार्यालय परिसरात प्रचंड गर्दी झाली. सकाळपासून उमेदवार व कार्यकर्त्यांनी परिसर फुलून गेला होता. परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाला टोकन पद्धतीचा अवलंब करावा लागला. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंतही अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होती. अलिबागमध्ये ५० हून अधिक उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित होते.

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी महाविकास आघाडी व शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारांनी मंगळवारी (दि. २०) मोठ्या उत्साहात उमेदवारी अर्ज दाखल केले. अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी अर्ज दाखल होत असताना कार्यकर्त्यांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. यानिमित्ताने महाविकास आघाडी व शेकापचे जोरदार शक्तीप्रदर्शन झाले.

प्रदीर्घ कालावधीनंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. सकाळी साडेनऊ वाजल्यापासून शेतकरी भवन परिसरात कार्यकर्त्यांची गर्दी जमू लागली. हातात

•› पान २ वर


(छायाचित्र : समीर मालोदे)

### जि.प.महाविकास आघाडीतील शेकापचे उमदेवार

| | | |
|---|---|---|
| १) | चेंढरे | आरती प्रफुल्ल पाटील |
| २) | थळ | सानिका सुरेश घरत |
| ३) | थळ | नलिनी मदन बना |
| ४) | चौल | सुरेश शांताराम खोत |
| ५) | आवास | संदिप विलास गायकवाड |
| ६) | चेंढरे | दर्शना रणजीत राऊत |
| ७) | काविर | मधुकर ढेबे |
| ८) | काविर | मोहन धुमाळ |
| ९) | आंबेपूर | पुजा अमित भगत |
| १०) | थळ | रिमा मनिष पडवळ |
| ११) | शहापूर | अनिल गोमा पाटील |
| १२) | शहापूर | सत्यविजय शंकर पाटील |

### पंचायत समितीतील शेकापचे उमदेवार

| | |
|---|---|
| १) किहीम | तृप्ती संदीप गायकवाड |
| २) आवास | कल्पना प्रफुल्ल पाटील |
| ३) कावीर | नरेश अनंत वर्तक |
| ४) कावीर | अनिल शांताराम पाटील |
| ५) रामराज | अंजली रामचंद्र पाटील |
| ६) आक्षी | प्रफुल्ल कृष्णा पाटील |
| ७) रुईशेत-भोमोली | कुसूम हेमंत शिद |
| ८) आंबेपूर | नंदकुमार एकनाथ भगत |
| ९) आंबेपूर | धनंजय चंद्रकांत म्हात्रे |
| १०) रईशेत भोमोली | रमेश कृष्णा उघडा |
| ११) रेवदंडा | राकेश वसंत म्हात्रे |
| १२) रेवदंडा | सुरेश शांताराम खोत |
| १३) चौल | अन्यया अमित फुंडे |
| १४) चौल | शरयु स्वप्नील अधिकारी |
| १५) थळ | नलिनी मदन बना |
| १६) वरसोली | सुहानी संतोष पाटील |
| १७) आंबेपूर | मृदुल दिगंबर म्हात्रे |

# देशात लोकशाहीला घातक वातावरण

### चित्रलेखा पाटील यांची परखड टीका

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

आज देश हुकूमशाहीच्या दिशेने जात असून, हे लोकशाहीसाठी घातक आहे, अशी परखड टीका शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली. रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी शिगेला पोहोचली असताना, शेतकरी कामगार पक्षाने आक्रमक तयारीसह निवडणूक मैदानात जोरदार एन्ट्री केली आहे. रायगड जिल्हा परिषदेवर लाल बावटा फडकणे ही जनतेची आणि काळाची गरज आहे, असा ठाम




आणि परखड निर्धारही चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारा शेकाप हा जनतेचा खरा पक्ष असून, शेतकरी कामगार पक्ष हा इंडिया आघाडी व महाविकास आघाडीचा घटक पक्ष आहे, हेही त्यांनी ठासून सांगितले. रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत शेकापने तरुण, सुशिक्षित व समाजकार्यात झोकून दिलेले उमेदवार मैदानात उतरवले असून, 'शेकाप आणि रायगड जिल्हा परिषद हे अटळ समीकरण आहे', असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

लोकाभिमुख आणि जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवायच्या असतील, तर जिल्हा परिषदेत शेकाप सत्तेत असणे अत्यावश्यक आहे, असे ठाम मत पाटील यांनी मांडले.

दरम्यान, शेकाप सोडून गेलेल्यांमुळे आमच्या मताधिक्यावर कसलाही परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी विरोधकांचे दावे फेटाळले. रायगडमध्ये शेकापचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होणारच, असा ठाम विश्वास व्यक्त करत चित्रलेखा पाटील यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

## पेणमध्ये चौथ्या दिवसअखेर सहा उमेदवारी अर्ज दाखल

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्याच्या चौथ्या दिवसाअखेर जिल्हा परिषद गटांसाठी एकूण सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. वडखळ, शिहू आणि रावे या तीन जिल्हा परिषद मतदारसंघांतून मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी शिवसेनेच्या पल्लवी प्रसाद भोईर आणि समीर म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे संजय जांभळे, भाजपचे वैकुंठ पाटील, मिलिंद पाटील, तसेच अपक्ष म्हणून पल्लवी प्रसाद भोईर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.



हे सर्व उमेदवार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील प्रस्थापित चेहरे असून, उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर पेण प्रांत कार्यालयात उमेदवार व समर्थकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या बुधवार हा शेवटचा दिवस असून, नेमके राजकीय चित्र उद्या स्पष्ट होणार आहे. युती-आघाडीचे संकेत मिळतात का, याबाबत राजकीय पक्षांचे पदाधिकारी सध्या मौन बाळगत आहेत. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे

•› पान २ वर

## पुणे ग्रँड चॅलेंज सायकल टूरदरम्यान भीषण अपघात



। पुणे । प्रतिनिधी ।

पुणे जिल्हा प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी गंभीर घटना मंगळवारी मुळशी तालुक्यात घडली. 'पुणे ग्रँड चॅलेंज सायकल टूर'दरम्यान मुळशी-कोळवण रस्त्यावर झालेल्या साखळी अपघातात ७० हून अधिक सायकलपटू एकमेकांवर आदळले. या अपघातात अनेक खेळाडू जखमी झाले असून, काहींना तातडीने वैद्यकीय उपचार देण्यात आले.

ही स्पर्धा कोळवण रोडवरून सुरू असताना रस्त्याची रुंदी अचानक कमी झाली. ताशी ६० ते ७० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या सायकलपटूंना अरुंद रस्ता आणि तीव्र वळणाचा अंदाज न आल्याने आघाडीवरील

•› पान २ वर

## जिते-कुंभे परिसरात बिबट्याचा वावर

### वन विभागाकडून सतर्कतेचे आवाहन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील जिते व कुंभे गावांच्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले असून, वन विभागाने स्थानिक नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या वावराबाबत कुजबूज सुरू होती. मात्र, ग्रामस्थ अंकुश शेळके यांनी बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळल्याची माहिती वन



विभागाला दिल्यानंतर या बाबीची अधिकृत दखल घेण्यात आली.

अंकुश शेळके यांच्या फार्महाऊसवर काम करणारे आकाश मिरकुटे यांनी सकाळी फार्महाऊसच्या गेटजवळ काही संशयास्पद ठसे पाहून त्यांचे छायाचित्र मालकाला पाठवले. त्यानंतर शेळके यांनी तात्काळ वन विभागाशी संपर्क साधत जिते-कुंभे परिसरातील स्मशानभूमी व

•› पान २ वर

## शिक्षक झाला हैवान!

### ५५ वर्षीय नराधमाकडून शाळकरी मुलीवर अत्याचार

। नाशिक । प्रतिनिधी ।

शिक्षकाकडूनच अल्पवयीन विद्यार्थिनीवर आठ महिन्यांपासून अत्याचार केला जात असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनं इगतपुरीसह संपूर्ण नाशिकमध्ये एकच खळबळ उडाली असून, याबाबत घोटी पोलीस ठाणे येथे पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकच्या इगतपुरी तालुक्यातील बुद्रुक-कारंजवाडी इथं संशयित रामचंद्र मनाजी कचरे (५५) हा जिल्हा परिषदेच्या शाळेत कार्यरत आहे. त्याने आपल्या पदाचा गैरवापर करत शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीला भीती दाखवत आणि दमदाटी करून जवळपास आठ महिने तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अखेर घाबरलेल्या या विद्यार्थिनीने सर्व हकीकत आपल्या घरच्यांना सांगितली असता त्यांनी तात्काळ घोटी पोलीस ठाणे गाठून याबाबत तक्रार दाखल करण्यात आली.

•› पान २ वर

### गौरव पाटील यांनी मिळवला मान | हंगामातील पहिली पेटी बाजारात

# अलिबागचा हापूस एपीएमसीत दाखल

प्रमोद जाधव

। रायगड ।

कोकणच्या मातीतून आलेला आणि चवीसाठी ओळखला जाणारा अलिबागचा हापूस आंबा यंदाच्या हंगामात सर्वप्रथम वाशी येथील एपीएमसी मार्केटमध्ये दाखल झाला आहे. अलिबाग तालुक्यातील केतकीचा मळा येथील आंबा उत्पादक शेतकरी गौरव शंकर पाटील यांच्या बागेतील आंब्याच्या दोन पेट्या वाशी



> गेल्या अनेक वर्षांपासून आंबा शेती करत आहे. यंदा पाऊस लांबणीवर गेल्याने मोठे आव्हान होते. तरीही योग्य देखभाल आणि मेहनतीमुळे आंबा लवकर तयार झाला. या हंगामातील पहिली आंब्याची पेटी वाशी एपीएमसीला पाठविता आली, याचा आनंद आहे.
>
> – गौरव शंकर पाटील, आंबा उत्पादक शेतकरी

एपीएमसी बाजारात दाखल झाल्या असून, या हंगामातील पहिली आंब्याची पेटी पाठविण्याचा मान गौरव पाटील यांना मिळाला आहे.

अलिबागचा आंबा स्थानिक ग्राहकांबरोबरच पर्यटकांच्या विशेष पसंतीचा असून, वाशी एपीएमसीमार्फत तो देश-विदेशातही पोहोचतो. त्यामुळे अलिबाग तालुक्यातील आंब्याला मोठी मागणी असते. भातशेतीसोबत आंबा लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असून, विशेषतः तरुण शेतकरी आधुनिक

•› पान २ वर

## मोदी सरकारवर सर्वोच्च न्यायालयाची नाराजी

### खासगी विद्यापीठांच्या नियमनाबाबत नव्याने प्रतिज्ञापत्र मागवले

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

खासगी विद्यापीठांच्या नियमनाशी संबंधित प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केंद्रातील मोदी सरकारच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाच्या निर्देशाला अनुसरुन केंद्र सरकारच्या कॅबिनेट सचिवांनी प्रतिज्ञापत्र दाखल करणे बंधनकारक आहे. असे असतानाही केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांमार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले. सरकारच्या या बेफिकीर कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करीत न्यायालयाने खासगी



विद्यापीठांच्या नियमनाबाबत नव्याने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश केंद्र सरकारला दिले आहेत.

देशभरातील खासगी आणि डीम्ड-टू-बी विद्यापीठांच्या नियमनाशी संबंधित प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठापुढे झाली. यावेळी केंद्र सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडली. या सुनावणीवेळी खंडपीठाला केंद्र सरकारची बेफिकीर कार्यपद्धत निदर्शनास आली. त्यावर खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त करताच सॉलिसिटर जनरल मेहता यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय पातळीवर कामकाजाच्या पदानुक्रमाच्या बाबतीत कॅबिनेट सचिव विभागांवर नियंत्रण ठेवत नाहीत. त्यामुळे खासगी विद्यापीठांच्या नियमनासंदर्भात उच्च शिक्षण सचिवांनी प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे स्पष्टीकरण

•› पान २ वर

# पालिकेतील भ्रष्टाचारावर काँग्रेसचा अंकुश राहील

## खासदार वर्षा गायकवाड यांचा इशारा



**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई महानगर पालिकेतील भ्रष्टाचारावर काँग्रेसचा अंकुश राहील. काँग्रेस पक्षाचे २४ नगरसेवक विजयी झाले आहेत. या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी मंत्री आमदार अस्लम शेख, आमदार अमिन पटेल आणि मुंबई काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रसारी माध्यमांशी बोलताना मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, महानगरपालिकेच्या निवडणुकीत एका बाजूला धनशक्ती होती, प्रचंड मोठ्या प्रमाणात पैसे वाटण्यात आले, विरोधी पक्षाला धमक्या देण्यात आल्या. सर्व यंत्रणा सत्ताधारी पक्षासाठी काम करत होती, तर दुसऱ्याबाजूला जनशक्ती होती. जनतेने काँग्रेस पक्षावर विश्वास ठेवत २४ नगरसेवक निवडून दिले आहेत. अत्यंत विपरित परिस्थितीत काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या निर्धाराने लढले आहेत. आमची संख्या कमी असली तरी मुंबईकरांच्या प्रश्नावर महापालिकेत आवाज उठवतील व जनतेचे प्रश्न सोडण्याचा प्रयत्न करतील. मुंबईकरांना चांगले रस्ते, स्वच्छ पिण्याचे पाणी, वाहतुक कोंडीतून सुटका, बेस्ट बसची चांगली सुविधा, प्रदुषणमुक्त मुंबई करायची आहे. महापालिकांच्या विविध संस्थांमध्ये खाजगीकरणाचा सपाटचा सुरु आहे त्यावर बारीक लक्ष ठेवण्याचे काम केले जाईल. मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचारावही अंकुश ठेवण्याचे कामही या नगरसेवकांच्या माध्यमातून केले जाईल, असे खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या.

एका प्रश्नाला उत्तर देताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, भाजपात हुकूमशाही आहे तर काँग्रेसमध्ये लोकशाही आहे, आमच्या पक्षात प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. कोणी टिका केली असेल तर पक्ष त्यावर निर्णय घेईल. माझ्या कार्यकर्त्यांचा माझ्यावर विश्वास आहे. आमच्या नगरसेवकांवर आमचा पूर्ण विश्वास आहे, त्यामुळे त्यांना कोणत्या हॉटेलमध्ये ठेवण्याची गरज वाटत नाही, असे वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

# प्रत्येक रकान्यात 'निरंक' नसल्याने नव्या ॲफिडेव्हिटची सक्ती

## तालुक्यात तिसऱ्या दिवशीही एकही नामनिर्देशन दाखल नाही




■ (छायाचित्र : शैलेश पालकर)

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे अत्यंत काटेकोरपणे तपासली जात असल्याने पोलादपूर तालुक्यात तिसऱ्या दिवशीही एकही नामनिर्देशनपत्र दाखल होऊ शकलेले नाही. ॲफिडेव्हिटमधील प्रत्येक रकान्यात स्वतंत्रपणे 'निरंक' असा उल्लेख नसल्यास अर्ज स्वीकारला जात नसल्याने अनेक उमेदवारांना परत पाठविण्यात आले आहे.

ॲफिडेव्हिटमध्ये सर्व रकान्यांसाठी एकत्रितपणे 'निरंक' असा उल्लेख किंवा 'वरीलप्रमाणे' असा मजकूर लिहिलेला असल्यास तो ग्राह्य धरला जात नसून, नव्याने ॲफिडेव्हिट करण्याची सूचना दिली जात आहे. यामुळे मंगळवार व बुधवार या शेवटच्या दोन दिवसांत उमेदवारांची मोठी गर्दी उसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तहसील कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी, मुंबई येथील उपजिल्हाधिकारी मीनाक्षी राठोड यांनी सोमवारपासून कार्यभार स्वीकारला आहे. तहसीलदार कपिल घोरपडे व सहकाऱ्यांकडून अर्जांची पूर्वछाननी केली जात आहे. सोमवारी २५ नामनिर्देशनपत्रांची विक्री झाली असून, आतापर्यंत एकूण ७१ नामनिर्देशनपत्रे विकली गेली आहेत. एकही अर्ज प्रत्यक्षात दाखल झालेला नाही. आज व उद्यादेखील याच प्रकारची कडक भूमिका कायम राहिल्यास उमेदवार नामनिर्देशन दाखल करू न शकल्याने निवडणुकीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

एकत्रित 'निरंक' असलेले ॲफिडेव्हिट स्वीकारण्यात आले, तर सोमवारी उमेदवारांना परत पाठविण्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, अशी चर्चा आहे. दरम्यान, तहसील कार्यालयाच्या परिसरात यावेळी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून, उमेदवारांव्यतिरिक्त कार्यकर्ते, पत्रकार व नागरिकांच्या प्रवेशावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. वाहन पार्किंगवरही निर्बंध लावण्यात आले आहेत. पक्षनिहाय नियमांमध्ये शिथिलता आल्यास निवडणूक यंत्रणेवर आरोप होण्याची शक्यता आहे. जात प्रमाणपत्र, जातवैधता पावती, विविध शपथपत्रे, शौचालय प्रमाणपत्र, बँक खाते, अनामत रक्कम पावती आदी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी उमेदवारांना अत्यल्प वेळ मिळाल्याने उर्वरित दोन दिवसांत सकाळी ११ ते दुपारी ३ या चार तासांत प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तणावाचे वातावरण निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

# आज सुप्रिया शेठ यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

तालुक्यातील अनेक वर्षांपूर्वीपासून राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये नावलौकिक प्राप्त केलेल्या सुप्रिया सुरेश शेठ यांचा उद्या मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे.



सुप्रिया सुरेश शेठ यांनी एकेकाळी सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या राजकारणामध्ये राज्यातील नेतेमंडळींसोबत सक्रिय सहभाग घेतला होता. मात्र, गेल्या अनेकवर्षांपासून त्यांनी सक्रीय राजकारणापासून अलिप्त राहून समाजकार्यात आपल्या ज्ञातीबांधवांसोबत राहून सेवाभावी वृत्ती जोपासली आहे. त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसपूर्तीनिमित्त पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा आयोजित करण्यात आला असून, सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत धार्मिकविधी, दुपारी १ वाजेपर्यंत औक्षण आणि अभीष्ट चिंतन तसेच त्यानंतर साडेतीन वाजेपर्यंत स्नेहभोजन असे आयोजन सुप्रिया शेठ यांच्या कन्या व पुत्र तसेच सूनबाई आणि नातवंडांनी केले आहे.

याप्रसंगी सुप्रिया शेठ यांचे मित्र मैत्रिणी, आप्तपरिवार, सामाजिक व राजकीय पक्षांतील कार्यकर्ते पदाधिकारी, हितचिंतक तसेच पोलादपूरचे ग्रामस्थ व्यापारी आणि कोकणातील दशनेमा गुजराती समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# अंमली पदार्थ तस्करास अटक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल परिसरात २ लाख ८३ हजार रुपये किमतीचा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमास पनवेल शहर पोलिसांनी अटक केली.

पनवेल शहरातील तक्का परिसरात अंमली पदार्थ विक्रीसाठी आरोपी येणार असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, सहा. पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे, पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे आणि हजरतअली पठाण आदींच्या पथकाने सापळा रचून आरोपी अनुरागकुमार यादव (वय ३३, रा. बिहार) याला अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी अंमली पदार्थ तसेच इतर माल असा एकूण २ लाख ९४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.




# ३३ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**| पेण | प्रतिनिधी |**

आद्य क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणे येथे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवक सप्ताह अंतर्गत जगद्गुरु श्रीपाद रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या प्रेरणेने आयोजित जीवनदान महाकुंभ २०२६ दि. १६ जानेवारी रोजी आयोजित केले होते.

त्याचे उद्घाटन सदानंद गायकवाड, माजी सभापती रोहा तालुका प्रभारी प्राचार्य एस.एस. भगत यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेची सर्व निर्देशक व कर्मचरी यांचे स्वागत श्रीपाद रामानंदचार्य नरेंद्रचार्य यांचे सेवेकरी यांच्या हस्ते झाले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा आयोजन योजना अधिकारी व्ही.आय. लोंढे, एस.व्ही. केदारी व एस.आर पवार यांनी सर्व आलेल्या डॉक्टर, स्टाफ व सेवेकरी यांचे स्वागत पुष्पगुच्छ देउन केले. रक्तदान शिबिरामध्ये संस्थेचे स्टाफ प्रशिक्षणाथी यांनी सहभाग घेतला होता.या वेळी एकूण ३३ रक्तदात्यांनी रक्तदान करून जीवनदान महाकुंभ २०२६ यशस्वी केला.

# दिघाटीला माघी गणेशजन्मोत्सव

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

गेल्या ३५ वर्षापासून सातत्याने सुरू असलेल्या पनवेल तालुक्यातील दिघाटी गावातील नवतरुण गणेश मित्र मंडळ यांच्या वतीने मंगळवार (दि. २०) जानेवारी ते गुरुवार (दि. २२) जानेवारीदरम्यान माघी गणेश जन्मोत्सवाच्या कार्यक्रम सुरुवात झाली आहे. या माघी गणेशोत्सवात कीर्तन, हरिपाठ व प्रवचनाद्वारे ज्ञानदान होणार आहे. यात सदानंद महाराज, अर्जुन महाराज, हिरामण महाराज, हरिश्‍चंद्र महाराज, केतन महाराज, बळीराम मोरे महाराज, हिराजी शिवकर महाराज, विनय पाटील महाराज, दामोदर गावंड महाराज, अशोक महाराज, कैलास महाराज तसेच अन्य कीर्तनकार कीर्तनाद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

# मुलाकडून वडिलांची साडेसतरा लाखांची फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

वडिलांच्या नावावर असलेल्या चार फ्लॅटचे बनावट भाडेकरारनामा बनवून त्यावर वडिलांच्या खोट्या सह्या करून परस्पर भाड्याने देत भाड्यापोटी मिळणारी १७ लाख ४० हजार रुपयांची स्वतः कडे ठेवत वडिलांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

सेवानिवृत्त प्रकाश पाटील (७१, रा. नवीन पनवेल) यांच्या करंजाडे परिसरात मालकीच्या असलेल्या चार फ्लॅटचे बनावट भाडेकरारनामा आरोपी प्रशांत पाटील (४९, रा. नवीन पनवेल) याने बनवून त्यावर वडिलांच्या खोट्या सह्या करून परस्पर भाड्याने देत भाड्यापोटी मिळणारी १७ लाख ४० हजार रुपयांची रक्कम स्वतःकडे ठेवत वडिलांची आर्थिक फसवणूक केली. यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात मुलाविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# पैसे मागण्याच्या वादातून इसमाला मारहाण

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पैसे मागण्याच्या वादावरून इसमाच्या डोक्यात लोखंडी सळीने मारहाण केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. समीर खान (३५) असे या जखमी इसमाचे नाव असून, पैसे मागण्याचे वादावरून आरोपी नायाब शेख याने समीर यांच्या डोक्यात लोखंडी सळीने मारून जखमी केले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## 'महाविकास'चे शक्तीप्रदर्शन

लाल बावटे घेऊन, ''शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो'', ''महाविकास आघाडीचा विजय असो'' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. शेकापचे नेते जयंत पाटील यांची भेट घेतल्यानंतर उमेदवार व कार्यकर्ते उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे रवाना झाले.कावीर जिल्हा परिषद मतदारसंघातून मोहन धुमाळ, कावीर पंचायत समिती मतदारसंघातून अनिल पाटील, रामराज पंचायत समिती मतदारसंघातून अंजली पाटील, थळ जिल्हा परिषद मतदारसंघातून सानिका सुरेश घरत, शहापूर मतदारसंघातून अभिषेक अनिल पाटील, आक्षी पंचायत समिती मतदारसंघातून प्रफुल्ल पाटील, चेंढरे पंचायत समिती मतदारसंघातून प्रिया ढवळे, महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे गटाकडून चौल जिल्हा परिषद मतदारसंघातून सुरेंद्र म्हात्रे तसेच आवास जिल्हा परिषद मतदारसंघातून राजाभाऊ ठाकूर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे यांच्यासह शेकाप व महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे ग्रँड चॅलेंज सायकल टूरदरम्यान भीषण अपघात

एका सायकलपटूचा ताबा सुटला. यानंतर मागून येणारे खेळाडू एकामागोमाग एक एकमेकांवर आदळले आणि साखळी अपघात झाला. अनेक खेळाडू ट्रॅक सोडून बाजूला फेकले गेले.

प्राथमिक माहितीनुसार, अनेक सायकलपटूंना किरकोळ जखमा झाल्या असून, चार ते पाच खेळाडूंना गंभीर दुखापतीमुळे तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले. अपघातानंतर सुमारे १५ मिनिटे स्पर्धा थांबवण्यात आली होती, त्यानंतर पुन्हा रेस सुरू करण्यात आली. या घटनेनंतर प्रशासनाच्या नियोजनावर संताप व्यक्त केला जात आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा आयोजित करताना रस्त्यांची स्थिती, अरुंद भाग आणि धोकादायक वळणांची पूर्वकल्पना खेळाडूंना देण्यात आली नव्हती, असा आरोप होत आहे. तसेच वळणावर आवश्यक बॅरिकेडिंग व धोक्याचे सूचना फलक अपुरे असल्याचेही निदर्शनास आले आहे.

## अलिबागचा हापूस एपीएमसीत दाखल

पद्धतीने आंबा शेतीकडे वळताना दिसत आहेत.यंदा पावसाने ऑक्टोबरअखेरपर्यंत हजेरी लावल्याने आंबा पिकासमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य वेळी फवारणी व निगा राखल्यामुळे आंब्याचे झाड सुरक्षित राहिले. या कठीण हवामानातही गौरव पाटील यांनी घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणजेच यंदाच्या हंगामातील पहिली आंब्याची पेटी बाजारात दाखल होऊ शकली आहे. वाशी येथील एपीएमसी बाजारात दोन पेटी आंबा दाखल झाल्याची माहिती आंबा उत्पादक शेतकरी गौरव पाटील यांनी केली.

पान १ वरून

## पेणमध्ये चौथ्या दिवसअखेर सहा उमेदवारी अर्ज दाखल

माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी मंगळवारी भाजप नेते रविशेठ पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.आज एका दिवसात ३० उमेदवारांनी ५५ कोरे नामनिर्देशन पत्रे दाखल केली असल्याची माहिती प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांनी दिली. दिनांक १६ जानेवारी ते २० जानेवारी या चार दिवसांत एकूण १९३ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली असून, उद्या हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेसाठी ५ गट, तर पंचायत समितीच्या १० निर्वाचन गणांसाठी ही नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. २२ दादर जिल्हा परिषद गटात भाजपचे रायगड जिल्हा महामंत्री तथा आमदार पुत्र वैकुंठ रवींद्र पाटील यांचा मंगळवारी एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. २३ वडखळ जिल्हा परिषद गटात, शिवसेनेकडून दोन वेळा निवडून आलेले संजय जनार्दन जांभळे यांनी शेतकरी कामगार पक्षाकडून उमेदवारी अर्ज भरला आहे.

भाजपकडून मिलिंद मोरेश्वर पाटील, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) कडून समीर सुभाष म्हात्रे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या गटात भाजप, शेकाप आणि शिवसेना (उबाठा) यांच्यात त्रिकोणी व हाय-व्होल्टेज लढत होण्याची चिन्हे दिसून येत आहेत. विद्यमान विजेते उमेदवारांचे अर्ज दाखल झाल्यानंतर चित्र अधिक स्पष्ट होणार असून, शेकापने आपली विजयी परंपरा कायम ठेवण्यासाठी संजय जांभळे यांच्यासारखा तगडा उमेदवार मैदानात उतरवला आहे.२५ शिहू जिल्हा परिषद गटात, शिवसेना (उबाठा) पक्षाच्या पल्लवी प्रसाद भोईर यांनी पक्षातर्फे एक व अपक्ष म्हणून एक असे दोन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या गटातून आज निवडणूक अधिकारी प्रवीण पवार यांच्याकडे एकूण सहा उमेदवारी अर्ज सादर करण्यात आले आहेत.

## जिते-कुंभे परिसरात बिबट्याचा वावर

नदीकाठच्या भागात बिबट्याचा वावर दिसून आल्याची माहिती दिली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत प्रभारी वनक्षेत्रपाल सुरेश भुजबळ यांनी आपले पथक तात्काळ कुंभे येथे पाठवले. नेरळचे वनपाल चव्हाण यांनी वनरक्षक व वनमजुरांच्या मदतीने संपूर्ण परिसराची पाहणी केली. पाहणीदरम्यान बिबट्याच्या खुणा व पावलांचे ठसे आढळून आले असून, जाते गावच्या हद्दीतील मुख्य रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात ठसे सापडल्याने या परिसरात बिबट्याचा वावर निश्चित झाल्याचे वन विभागाने स्पष्ट केले आहे. हा परिसर माथेरानच्या जंगलालगत असून, समोरच उल्हास नदीचे पात्र असल्याने, रात्रीच्या वेळी पाणी पिण्यासाठी बिबट्या या भागात आला असावा, असा अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे.वनपाल चव्हाण यांनी स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधत रात्री एकटे घराबाहेर न पडणे, नदीकाठी व जंगलालगत विशेष काळजी घेणे, तसेच पाळीव प्राण्यांची सुरक्षा करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, वन विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, ग्रामस्थांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

फार्महाऊसवर काम करणारे आकाश मिरकुटे यांनी सकाळी फार्महाऊसच्या गेटजवळ काही संशयास्पद पावलांचे ठसे पाहिले. त्यांनी त्वरित त्याचे फोटो मला पाठवले. त्यानंतर मी कर्जत वन विभागाशी संपर्क साधला. वनपाल चव्हाण आपल्या पथकासह घटनास्थळी आले व नदीकाठचा परिसर तसेच मुख्य रस्त्यांची पाहणी केली. या ठिकाणी बिबट्याचे स्पष्ट पावलांचे ठसे आढळले. हा परिसर माथेरानच्या जंगलालगत असून समोरच उल्हास नदी असल्याने, रात्री पाणी पिण्यासाठी बिबट्या येथे आला असावा, असा अंदाज वन विभागाने व्यक्त केला असल्याचे ग्रामस्थ अंकुश शेळके यांनी सांगितले . बिबट्या हा वन्यप्राणी असून, मनुष्यवस्तीजवळ असल्यास नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. रात्री एकटे बाहेर पडू नये, जंगल व नदीकाठ परिसरात विशेष काळजी घ्यावी. पाळीव प्राण्यांची योग्य सुरक्षा करावी. घराभोवती कचरा साचू देऊ नये. अत्यावश्यक असल्यास रात्री घोळक्याने बाहेर पडावे व आवाज करून चालावे. बिबट्या दिसल्यास तात्काळ वन विभाग, पोलीस किंवा स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा व लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

## मोदी सरकारवर सर्वोच्च न्यायालयाची नाराजी

मेहता यांनी दिले. मात्र, खंडपीठाने केंद्र सरकारचे हे स्पष्टीकरण मान्य करण्यास नकार दिला. तसेच संबंधित विभागाच्या मंत्रालयाच्या सचिवांनी वैयक्तिकरित्या पुष्टी केलेले नवीन अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दोन आठवड्यांच्या आत दाखल करण्याचे आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण देशभरातील खासगी विद्यापीठांच्या नियमनाचा विषय सुनावणीसाठी घेतला आहे. तथापि, या प्रकरणात महाराष्ट्र, गुजरात, उत्तराखंड, अंदमान-निकोबार, दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव, लडाख, लक्षद्वीप आणि चंदीगड अशा राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी अद्याप आपले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. न्यायालयाने महाराष्ट्रासह इतर संबंधित राज्यांना न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्याप्रकरणी अवमान कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे.

## शिक्षक हैवान झाला!

पीडितेच्या तक्रारीनंतर नाशिकच्या घोटी पोलीस ठाणे येथे संशयित रामचंद्र मनाजी कचरे (५५) याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, घोटी पोलीस अधिक तपास करत आहेत. मुख्याध्यापक कृष्णा ज्ञानू दाभोळे याने पीडित विद्यार्थिनीच्या आईच्या आजारपणाचा गैरफायदा घेऊन तिच्यावर दोनदा अत्याचार केला. पोलिसांनी आरोपी मुख्याध्यापकाला अटक करून पोलीस कोठडीत पाठवलं आहे. दरम्यान, आरोपी मुख्याध्यापक कृष्णा ज्ञानू दाभोळे हा सावर्डेकर कॉलनी, मुरगूड येथे वास्तव्यास होता. त्याने पीडित विद्यार्थिनीच्या आईच्या आजारपणाचा फायदा घेतला आणि या गैरफायद्यातून त्याने विद्यार्थिनीवर दोन वेळा लैंगिक अत्याचार केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, मौजे गौरकामत ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मी.त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
| --- | --- | --- | --- | --- |
| हरिश्चंद्र दामू पाटील | २८ | २/ब | ०-४४-३० | ६=४१ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन मी सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करेन. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत.

हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत

दिनांक :- २१/१/२०२६

खरेदीदार
**रमेश वामन आगिवले**
रा. खानवले भोकरपाडा,रायगड
मो.९५४५७१४५८९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळिवणेत येते की, आमचे अशिल १.श्री. भगवान नारायण बोराडे, २. मयुर भगवान बोराडे दोघेही रा. वडवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे वडवली, ता. कर्जत, जि.रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-**

| जमीन मालक | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रू. पै. |
| --- | --- | --- | --- |
| सुनिला प्यारेलाल शर्मा | ४६/१ | क्षेत्र ०.५०.००<br>पोट खराबा ०.१८.००<br>एकुण क्षेत्र ०.६८.००<br>यापैकी विकत दिलेले<br>क्षेत्र ०.२५.२५ | ०.२९ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे

तारीख :- २१/०१/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, रामवाडी, पेण.

क्र.राप/रायगड/वाह/वाणिज्य/९० दिनांक :- २०/०१/२०२६

**निविदा सुचना क्र. ०१/२०२५**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण-रामवाडी यांचेकडून निविदा सुचना क्र.०१/२०२५ अन्वये वाणिज्य आस्थापनांकरिता निविदा मागाविण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यामधील १) टी स्टॉल-वडखळ बसस्थानक, २) गिफ्ट सेंटर-वडखळ बसस्थानक, ३) जनरल प्रोव्हिजन स्टॉल -वडखळ बसस्थानक, ४) केश कर्तनालय-वडखळ बसस्थानक, ५) दूरध्वनीकक्ष- इंदापूर बसस्थानक, ६) दूध व दूग्धजन्य स्टॉल- अलिबाग बसस्थानक, ७) ऊस रसवंतीगृह-श्रीवर्धन बसस्थानक, ८) टी स्टॉल - आवास बसस्थानक ९) टी स्टॉल- साजगांव बसस्थानक या आस्थानांकरिता अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने सात दिवसांकरिता द्वितीय व अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. इच्छुक व्यक्तिंनी दि. २८.०१.२०२६ रोजी १५.१५ वाजेपर्यंत आपल्या निविदा सादर कराव्यात व निविदा दि. २८.०१.२०२६ रोजी सकाळी १५.३० वाजता उघडण्यात येतील.

कोरे छापील तांत्रिक व आर्थिक निविदा फॉर्म/अटी व शर्ती फॉर्म, जामीनदार संमतीपत्र तसेच विक्री करावयाचे पदार्थांची यादी इत्यादी तपशील विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण - रामवाडी येथे शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत स्नॅकबारकरिता रू. ११८०/- (वस्तु व सेवाकर १८ % सहित) व इतर स्टॉलकरिता रू. ५९०/- (वस्तु व सेवाकर १८% सहित) विहित शुल्क भरले नंतरच निविदा फॉर्म मिळतील.

**सही/-**
**विभाग नियंत्रक,**
**रा.प.रायगड विभाग, पेण**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक श्री.महेशकुमार चमनलाल, राहणार :- बी ३७, दुसरा मजला, न्यु मुनतान नगर दिल्ली ११००५६ यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
| --- | --- | --- | --- |
| १५ | २ | १-६८-०० | ०-९७ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील ट्रस्ट, कुळअखत्यारपत्र, बयानापावती हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यांसहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही. तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथीत हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजून पुढील खरेदीचा व्यवहार आमचे आशील पुर्ण करतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि. २६/०१/२०२६

सही/-
**(ॲड. विलास दौलत ऐनकर)**
मु.पो. खांडस, ता. कर्जत, जि. रायगड
मोबाईल नं.९८८१२९८३३८/९५७९८८०१९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल श्री.दत्तात्रय हांडे आणि सौ.सरला दत्ता हांडे रा. पुलाची वाडी, किरवली, कर्जत, जि. रायगड ४१०२०१ यांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. मौजे गणेगाव चिंचवली ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

| जमिन मालक | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हेक्टर आर चौ.मी | आकार रु. पै. |
| --- | --- | --- | --- | --- |
| श्री. नवनित पंडीत कदम,<br>श्री. संदेश राजाराम भोईर | ५५ | १/ब | ०.२२.०० | १.८२ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क मृत्युपत्रांकीत दान, गहान, बक्षिस, फरोक्त, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

तारीख : २१/०१/२०२६

**ॲड. चंदा सुधाकर खापने**
पत्ता-ज्ञानदिप सोसायटी, कर्जत-नेरळ रोड,
किरवली, ता. कर्जत, जि. रायगड
मोबाईल नंबर-९८१९४२१८६८

### - जाहीर नोटिस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे धोकवडे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक **संतोष पांडुरंग पाटील व सुरेखा पांडूरंग पाटील** यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धोकवडे, ता.अलिबाग, भूमापन क्रमांक व उपविभाग ३०६/१/१, जिरायत क्षेत्र ०-३१-०० हे. आर., पो.ख.०-०१-५०, आकार रु. ७.७६/- ही मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२१.०१.२०२६

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग








• रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी महाविकास आघाडी व शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारांनी मंगळवारी (दि.२०) मोठ्या उत्साहात उमेदवारी अर्ज दाखल केले. अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी अर्ज दाखल होत असताना कार्यकर्त्यांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.

• (छायाचित्र- समीर मालोदे)
































## उरणमधून तीन अर्ज दाखल

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, मंगळवारी (दि.२०) महाविकास आघाडीच्या वतीने पहिल्याच दिवशी जोरदार शक्तीप्रदर्शनात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

जासई जिल्हा परिषद गणातून माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, तर जासई पंचायत समिती गणातून उरण पंचायत समितीचे माजी सभापती व शेकापचे ज्येष्ठ नेते नरेश घरत यांच्या पत्नी निर्मला नरेश घरत तसेच चिर्ले पंचायत समिती गणातून शेकापचे युवा नेते दीपक मढवी यांच्या पत्नी व माजी सरपंच प्रियंका दीपक मढवी यांनी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सोमानी यांच्याकडे दाखल केले.



उरण तालुक्यात भाजपला रोखण्यासाठी काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे) तसेच इतर मित्र पक्षांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात करण्यात आली असून, पहिल्याच दिवशी मविआच्या उमेदवारांच्या अर्ज दाखल प्रक्रियेला कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती लाभली.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जिल्हा उपाध्यक्ष रामनाथ पंडित, प्रदेश सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, शेकापचे उरण तालुका चिटणीस रवी घरत, उरण काँग्रेस तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ नेते व माजी सभापती नरेश घरत, सरपंच संतोष घरत, कामगार नेते संतोष घरत, माजी सरपंच अविनाश पाटील, सरपंच कीर्तीनिधी ठाकूर, बी.एम. ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर यांच्यासह आजी-माजी सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उरण तालुक्यातील ४ जिल्हा परिषद आणि ८ पंचायत समिती गणांसाठी दि.५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर दि.१६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली होती. मात्र, उमेदवार निश्चितीसाठी वेळ लागल्याने दि.१६ ते १९ जानेवारीदरम्यान एकही अर्ज दाखल झाला नव्हता. दि.२१ जानेवारी ही अर्जदाखल करण्याची अंतिम तारीख असून, दि.२० जानेवारीपासून अर्ज दाखल करण्यास वेग आला आहे. मंगळवारी एकूण ९ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, त्यामध्ये महाविकास आघाडीच्या ३ प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे.

# गुंड आणखी सोकावला

एक गुन्हा पचला की, मग गुन्हेगार सोकावतो. त्याची गुंडगिरी वाढते. डोनाल्ड ट्रम्प यांचे तेच झाले आहे. व्हेनेझुएलाचा खून पचवल्यानंतर ट्रम्प यांची नजर ग्रीनलँडवर पडली आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो यांना रातोरात उचलून अमेरिकेत आणण्यात आले, त्यांच्यावर खटला भरण्यात आला. आपण व्हेनेझुएलाचे हंगामी राष्ट्रप्रमुख असल्याचे ट्रम्प यांनी जाहीर केले. शिवाय तिथल्या तेलाच्या खाणींवर अमेरिकी कंपन्यांचे वर्चस्व राहील हेही जाहीर केले. तरीही जगभरातून किरकोळ निषेधाच्या पलिकडे काहीच प्रतिकार झाला नाही. त्यामुळे ट्रम्प यांचा धीर चेपला असून त्यांनी ग्रीनलँडवर कबजा करण्याची तयारी चालवली आहे. व्हेनेझुएला ही दक्षिण अमेरिकेतील आफ्रिकी काळ्या व निमगोऱ्या लोकांचे गरीब राष्ट्र. याउलट ग्रीनलँड हा उत्तरेकडच्या आर्क्टिक बर्फाळ प्रदेशातला गोऱ्यांचा देश आहे. उत्तर ध्रुव इथून केवळ ८०० किलोमीटरवर आहे. इथे वर्षातील बराच काळ शून्यापेक्षाही खाली तापमान असते. पूर्वी हे बेट डेन्मार्कच्या अखत्यारीत होता. पण आता स्वायत्त असून त्याची स्वतंत्र संसद आहे. त्याची लोकसंख्या ५६ हजार म्हणजे आपल्याकडच्या एखाद्या तालुक्यापेक्षाही कमी आहे. (अलिबाग तालुक्याची लोकसंख्या सुमारे तीन लाख असावी.) अर्थात युरोपातले सर्वच देश कमी लोकसंख्येचे आहेत. युरोपचा भाग असल्याने त्याची सुरक्षा व्यवस्था ही नाटो संघटनेची संयुक्त जबाबदारी आहे. अमेरिकेचा याच्याशी एरवी काही संबंध येण्याचे कारण नव्हते. ग्रीनलँड अमेरिकेपासून सुमारे ५ हजार किलोमीटर लांब आहे. पण पूर्वी अमेरिका व रशिया यांचे संबंध ताणलेले असल्याच्या काळात त्याला महत्व आले. कारण, रशियाशी युध्द झालेच तर तिथून येणारी क्षेपणास्त्रे ग्रीनलँडच्या मार्गाने अमेरिकेकडे येण्याचा धोका होता. या सबबीखाली खूप पूर्वीच अमेरिकेने इथे आपला लष्करी तळ उभारलेला आहे. वास्तविक सध्याच्या स्थितीत रशिया अमेरिकेवर हल्ला करण्याच्या अवस्थेत नाही. युक्रेनचे युध्दच त्याला भारी पडते आहे. तरीही ट्रम्पबुवांना समाधान नाही. त्यांना आता हा सर्व देशच हडपायचा आहे. ग्रीनलँड अमेरिकेच्या ताब्यात आल्याखेरीज जग शांततेने राहू शकणार नाही असे म्हणून त्यांनी आपला दावा ठोकला आहे.

## युरोपला अक्कल आली

ट्रम्प यांच्या या दाव्याला युरोपीय देशांनी विरोध केला आहे. यातही गंमत पाहण्यासारखी आहे. व्हेनेझुएलाच्या बाबतीत ब्रिटनने काहीही प्रतिक्रिया नोंदवली नव्हती. पण आता आपल्या अंगणातच ट्रम्पबुवा घुसखोरी करू पाहत आहेत म्हटल्यावर यांना लगेच देशांचे सार्वभौमत्व, लोकशाही वगैरे गोष्टींची आठवण झाली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी ट्रम्प यांना फोन करून आपला विरोध नोंदवला. फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यांची अलिकडेच ट्रम्प यांनी जाहीर टिंगल केली होती. त्या मॅक्रॉन यांनीही ट्रम्प यांना आगळीक न करण्याचा इशारा दिला. युरोपीय देशांनी ग्रीनलँडच्या मदतीसाठी आपले सैन्य पाठवण्याचे संकेत दिले आहेत. युरोपचे देश एरवी अमेरिकेचे नाटोतील भागीदार आहेत. किंबहुना, अमेरिकेचा पैसा व शस्त्रे आणि युरोपचे सैनिक अशी ही नाटोची भागीदारी रशियाला धमक्या देण्यासाठी दुसऱ्या महायुध्दापासून कार्यरत आहे. तिच्यातच फूट पडणे ही मोठी घटना आहे. पण ट्रम्प यांनी गेल्या वर्षी सत्तेत आल्यापासूनच युरोपीय देशांची लायकी काढली होती. हे देश नाटोसाठी पुरेसे पैसे देत नसल्याचा आरोप केला होता. अमेरिका युरोपला पोसणार नाही अशी भाषा केली होती. जर्मनीत जाऊन तिथल्या अध्यक्षांच्या देखत त्यांचा अपमान अमेरिकी संरक्षणमंत्र्यांनी केला होता. पण युरोपीय देशांनी तेव्हा हा अपमान गिळला होता. त्यामुळे ट्रम्प निर्ढावले असून त्यांनी युरोपला आणखी खच्ची करण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यानुसार ग्रीनलँड अमेरिकेच्या ताब्यात देण्याला मान्य करा, नाहीतर तुमच्यावर दहा टक्के आयातकर लागू होईल असे जाहीर केले आहे. युरोपची वाईन, जर्मनीची मशिनरी, गाड्या इत्यादी अमेरिकेत जातात. यांच्या निर्यातीवर युरोप बराच अवलंबून आहे. आयातकर वाढला तर ही निर्यात ठप्प होईल. त्यामुळे युरोपची कोंडी होणार आहे. मात्र त्यापायी ग्रीनलँडला वाऱ्यावर सोडणे हेही शक्य नाही. कारण ट्रम्प यांना हा बलात्कार पचू दिला तर ते उद्या आणखी कोणाचा घास घेतील हे सांगता येत नाही हे युरोपला कळून चुकले आहे. त्यामुळे नाईलाजाने का होईना युरोप ट्रम्पच्या विरोधात उभा ठाकला आहे.

## भारतासाठी महत्व

ग्रीनलँडमध्ये निकेल, लिथियम, कोबाल्ट वगैरे अतिदुर्मिळ खनिजांचे साठे मोठ्या प्रमाणात असावेत असा अंदाज आहे. सध्या अशा खनिजांसाठी सर्व जग चीनवर अवलंबून आहे. मध्यंतरी चीनने यांचा पुरवठा बंद करून सर्वच देशांची कोंडी केली होती. त्याला पर्याय म्हणून ग्रीनलँडमधील खनिज साठ्यांवर कबजा करण्याचा ट्रम्प यांचा हेतू दिसतो. दुसरे म्हणजे या प्रदेशात मोठ्या प्रमाणात खनिज तेलही आहे. तेही ट्रम्प यांना हवे आहे. एखाद्या देशाने दुसरा देश विकत घेणे हा प्रकार एकविसाव्या शतकात घडू शकतो यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. पण ट्रम्प यांनी ते करण्याचा चंग बांधला आहे. पूर्वी १८०० ते १८५० च्या काळात अमेरिकेने रशिया व इतर देशांकडून लुईसियाना किंवा अलास्का हे प्रदेश खरेदी केले होते. पण आता कोणताही देश स्वतःचे स्वातंत्र्य असे गमावू इच्छिणार नाही. पण ट्रम्प यांना तिथल्या लोकांच्या इच्छेशी काही देणेघेणे नाही. ते तिकडे केवळ एक जमिनीचा मौल्यवान तुकडा म्हणून पाहत आहेत. ट्रम्प हे मुळात एक बिल्डर असल्याने त्यांची बुध्दी याच रीतीने चालणे हे अपेक्षित आहे. पण अमेरिकेचे अध्यक्षपद मिळाल्यानंतरही त्यांची बिल्डरची बकासुरी वृत्ती थांबू नये हे नवलाचे आहे. अमेरिका हा देश कायमच असा व्यापारी व जंगली मनोवृत्तीने वागला आहे. तरीही ट्रम्प यांचे वागणे त्यातल्याही सर्व मर्यादा पार करणारे आहे. याच दरम्यान ट्रम्प यांनी इराणला धमक्या दिल्या आहेत. इराणशी व्यापार करणाऱ्या देशांवर प्रतिबंध लागू केले आहेत. इराणमधील चाबहार हे बंदर भारताने विकसित करायला घेतले होते. चीन व पाकिस्तानच्या ग्वादार बंदराला शह देण्यासाठी चाबहारचा उपयोग होईल असे सांगितले जात होते. पण आता अमेरिकेच्या निर्बंधांमुळे येत्या काही दिवसात भारताला हे बंदर सोडून द्यावे लागणार आहे. तेथील हजारो कोटींची गुंतवणूक वाया जाणार आहे. याच चाबहार बंदरातून कुलभूषण जाधवचे अपहरण करून त्याला पाकिस्तानी लष्कराने तुरुंगात टाकले आहे. कुलभूषण हा भारतासाठी हेरगिरी करीत होता असा त्याच्यावर आरोप आहे. इतकी किंमत देऊन आता अमेरिकेच्या धमक्यांमुळे भारताला चाबहार सोडावे लागेल. नरेंद्र मोदी स्वतःला कितीही विश्वगुरु म्हणवून घेत असले तरी ट्रम्पच्या इशाऱ्यांना ते उत्तरही देऊ शकत नाहीत अशी अवस्था आहे. ट्रम्पची भेटही ते टाळत आहेत. याच कारणास्तव त्यांनी दावोस वगैरे ठिकाणी जाणे बंद केले आहे. ट्रम्पनेही भारतासोबतचा व्यापार करार बंद करून ठेवला आहे. त्यामुळे आपल्या निर्यातीवर सध्या ५० टक्के शुल्क लागू असून आपल्याकडून अमेरिकेत जाणारा माल थांबला आहे. यासाठीच ग्रीनलँडमध्ये काय होते यावर भारताला लक्ष ठेवावे लागणार आहे.

विचार

# मित्र देश कसे झाले शत्रू?

***सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे दोन्ही सुन्नी मुस्लिम देश आहेत. मध्य पूर्वेत बराच प्रभाव असून ते एकमेकांचे विश्वासू भागीदार मानले गेले आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर हे दोन आखाती महाकाय देश एके काळी एकमेकांच्या दयेवर उभे होते. आखाती देश अडचणीत आला, तेव्हा ते एकमेकांची ढाल बनले; पण आज त्यांच्यात शत्रुत्व आहे. हे दोन्ही देश एकमेकांच्या रक्ताचे तहानलेले आहेत.***



प्रा.जयसिंग यादव

आखाती प्रदेशातील स्पर्धा ही मुस्लिम देशांचे खलिफा बनण्याची शर्यत आहे. सुरक्षा असो, तेल असो, राजनय असो किंवा प्रादेशिक राजकारण; सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे दोघेही प्रत्येक आघाडीवर एकत्र काम करायचे; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये परिस्थिती बदलली आहे. त्यांच्यातील अविश्वासाची दरी इतकी रुंदावली, की आज शत्रुत्वात बदलली आहे. आता येमेन मुद्द्यावरून सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये तणाव वाढला आहे. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये येमेनच्या भूमीवर संघर्ष सुरू झाला आहे. सौदी अरेबियाने येमेनमध्ये संयुक्त अरब अमिरातीच्या मालकीच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीवर हवाई हल्ला केला. यामुळे सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमधील संबंध ताणले गेले. सौदी सैन्याने येमेनमधील मुकाल्ला या दक्षिणेकडील बंदरावर वारंवार बॉम्बहल्ला केला. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला. परिस्थिती इतकी बिकट झाली, की येमेनमधील सौदी समर्थित सरकारने संयुक्त अरब अमिरातीच्या सैन्याला देश सोडण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम दिला. त्यानंतर, संयुक्त अरब अमिरातीनेही घाईघाईने आपले उर्वरित सैन्य मागे घेतले. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी केले, की ते येमेनमधील आपली उर्वरित लष्करी उपस्थिती संपवेल. इतिहासात मागे वळून पाहिले, तर लक्षात येईल, की दोन्ही देशांमधील शत्रुत्व नवीन नाही. दोघे चांगले मित्र राहिले आहेत. अनेकदा आखाती देशांमध्ये या दोन्ही देशांमधील मैत्रीचे दाखले जात होते; परंतु काही हितसंबंधांमुळे ही मैत्री आता शत्रुत्वात बदलली आहे. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) हे आखाती प्रदेशातील दोन प्रमुख मुस्लिम देश एके काळी कट्टर मित्र होते. त्यांनी अरब जनांदोलनांपासून येमेन युद्धापर्यंत अनेक कारवायांप्रसंगी एकत्र काम केले; पण आता परिस्थिती बदलली आहे.

आर्थिक स्पर्धा, प्रादेशिक प्रभाव आणि वेगवेगळ्या रणनीतींमुळे त्यांना शत्रू बनवले आहे. ही कहाणी शतकानुशतके जुन्या संबंधांपासून सुरू होते आणि आजच्या भू-राजकीय तणावापर्यंत पोहोचते. सौदी अरेबिया सुरुवातीपासूनच संयुक्त अरब अमिरातीचा समर्थक होता. दोन्ही देश सुन्नी मुस्लिमबहुल राजेशाही आहेत. दोघांची अर्थव्यवस्था तेलावर अवलंबून आहे. आखातातील इराणच्या वाढत्या प्रभावाबद्दलची चिंता आणि आखाती प्रदेशात स्थैर्य राखण्याचे सामायिक ध्येय यामुळे त्यांना जवळ आणले गेले होते. दोघांमधील दीर्घकालीन मैत्रीमध्ये इराण हा एक घटक आहे. दोन्ही देशांची मैत्री २०१० च्या दशकाच्या सुरुवातीला घट्ट झाली. क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान (एमबीएस) आणि युएईचे शासक मोहम्मद बिन झायेद (एमबीझेड) यांनी आपले वैयक्तिक संबंध मजबूत केले. ते इस्लामिक कट्टरतावाद आणि इराणविरुद्ध एकत्र आले. तथापि, हळूहळू तेढ निर्माण झाली. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे आखाती प्रदेशात सुरक्षेचे दोन मजबूत आधारस्तंभ मानले जात. २०११ मध्ये जेव्हा अरब स्प्रिंग क्रांतीला वेग आला, तेव्हा त्यांनी येमेनमध्ये इराण समर्थित हौथींविरुद्ध युती स्थापन केली. २०११ च्या अरब स्प्रिंग क्रांतीने मध्य पूर्वेतील राजकारणाला हादरवून टाकले. इजिप्तमधील जनरल सिसी यांच्या सरकारला पाठिंबा देणे असो किंवा लिबिया आणि येमेनमध्ये हस्तक्षेप करणे; दोन्ही देशांनी एकत्र रणनीती आखली. त्यांची जोडी 'अरब जगाचे जुळे स्तंभ' म्हणून ओळखली जाऊ लागली.

२०११ मध्ये, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियाने इस्लामी चळवळींविरुद्ध संयुक्त आघाडी स्थापन केली. त्यांनी बहरीनमधील उठाव दडपण्यासाठी संयुक्त सैन्य पाठवले आणि २०१३ मध्ये इजिप्तमधील मुस्लिम ब्रदरहूड सरकारच्या लष्करी हकालपट्टीसाठी सहकार्य केले. मार्च २०१५ मध्ये दोन्ही देशांनी हुथी बंडखोरांविरुद्ध लष्करी मोहीम सुरू केली. संयुक्त अरब अमिरातीने सैन्य पुरवले, तर सौदी अरेबियाने हवाई शक्ती पुरवली. तथापि, २०१९ मध्ये संयुक्त अरब अमिरातीने आपले सैन्य मागे घेतले आणि दक्षिणी फुटीरतावाद्यांना (एसटीसी) पाठिंबा दिला, तर सौदी अरेबिया येमेनी सरकारसोबत राहिला. हा पहिला मोठा वाद होता. जून २०१७ मध्ये दोन्ही देशांनी कतारवर दहशतवादाला पाठिंबा देण्याचा आरोप करत बहिष्कार टाकला. २०२१ च्या 'अल-उला' शिखर परिषदेत सौदी अरेबियाने कतारशी समेट केला, तर संयुक्त अरब अमिरातीने सौम्य भूमिका घेतली. सप्टेंबर २०२० मध्ये संयुक्त अरब अमिरातीने इस्रायलशी संबंध सामान्य केले; परंतु सौदी अरेबिया पॅलेस्टिनी राज्याच्या मागणीवर ठाम राहिला. २०२२ मध्ये संयुक्त अरब अमिराती-इस्रायल व्यापार २.५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला; परंतु सौदी अरेबियाने त्यापासून स्वतःला दूर केले. असे म्हटले जाते, की सौदी अरेबियाचे इस्रायलशी असलेले शत्रुत्व आणि संयुक्त अरब अमिरातीच्या इस्रायलशी असलेली जवळीक हे शत्रुत्वाचे एक प्रमुख घटक होते.

जुलै २०२१ मध्ये संयुक्त अरब अमिरातीने 'ओपीईसी'मध्ये सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील उत्पादन कपात रोखली आणि आपल्या बेसलाइनमध्ये वाढ करण्याची मागणी केली. फेब्रुवारीमध्ये सौदी अरेबियाने परदेशी कंपन्यांना रियाधमध्ये मुख्यालय स्थापन करण्यास सांगितले आणि दुबईला आव्हान दिले. जुलैमध्ये सौदी अरेबियाने संयुक्त अरब अमिरात मुक्त क्षेत्रांमधून आयातीवरील शुल्क उठवण्यास नकार दिला. सुदानी गृहयुद्ध एप्रिल २०२३ मध्ये सुरू झाले. या वेळी संयुक्त अरब अमिरातीने 'रॅपिड सपोर्ट फोर्सेस'ला शस्त्रे पुरवली, तर सौदी अरेबियाने सुदानी सशस्त्र दलांना पाठिंबा दिला आणि युद्धबंदी चर्चा आयोजित केली. डिसेंबर २०२४ मध्ये सीरियामध्ये असद यांना पदच्युत करण्यात आले. दोन्ही बाजूंनी नवीन नेतृत्वाशी संपर्क साधला; परंतु संयुक्त अरब अमिरातीने असद यांच्यावर टीका केली. येमेनमध्ये याच महिन्यात संयुक्त अरब अमिराती समर्थित 'एसटीसी'ने सौदी अरेबियाची 'लाल रेषा' ओलांडून हद्रामौत तेलक्षेत्रे ताब्यात घेतली. सौदी जेट आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात शत्रुत्व सुरू झाले. शत्रुत्वाचा मुख्य स्रोत येमेनमधील मुकाल्ला हे दक्षिणेकडील बंदर होते. सौदीच्या नेतृत्वाखालील युतीने मुकाल्ला बंदरावर हवाई हल्ला केला. सौदी अरेबियाच्या मते त्यांनी संयुक्त अरब अमिराती समर्थित फुटीरतावाद्यांना परदेशी लष्करी मदत पोहोचवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोदीला लक्ष्य केले.

सौदी अरेबियाने स्पष्टपणे सांगितले, की हा हल्ला संयुक्त अरब अमिरातीच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीला लक्ष्य करत होता. तथापि, संयुक्त अरब अमिरातीने सौदी अरेबियाचे दावे फेटाळून लावले आणि म्हटले, की हल्ला केलेल्या मालवाहतुकीत शस्त्रे नव्हती, तर संयुक्त अरब अमिरातीच्या लष्करासाठी पुरवठा आणि उपकरणे होती. ही पहिली आणि नवीनतम थेट चकमक होती. या महिन्याच्या सुरुवातीपासूनच सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या आखाती देशांमधील तणाव सातत्याने वाढत आहे. संयुक्त अरब अमिरातीने केलेल्या घोषणेमुळे हा तणाव कमी होत असल्याची अटकळ निर्माण झाली. असे असूनही, दोन्ही देशांच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षांमधील संघर्ष अधिकाधिक स्पष्ट होत आहे. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे, की ते येमेनमधून आपली उर्वरित लष्करी उपस्थिती मागे घेईल. आम्ही २०१५ पासून अरब युतीचा भाग आहोत आणि येमेनमधील कायदेशीर सरकारला पाठिंबा देत आहोत. संयुक्त अरब अमिरातीच्या सैन्याने २०१९ मध्ये येमेनमधील आपले मुख्य लष्करी ऑपरेशन पूर्ण केले आणि परतले; परंतु अतिरेकी शक्तींना रोखण्यासाठी काही सैन्य मागे ठेवण्यात आले होते. तथापि, अलिकडच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, संरक्षण मंत्रालय उर्वरित सैन्य मागे घेण्याचे आवाहन करत आहे. हा तात्पुरता शह असला, तरी गेल्या दशकभरातील शत्रुत्व पाहता या दोन देशांमधील संघर्ष संपण्याची शक्यता कमीच आहे.

# सावधान! 'लोकशाही' हॉटेलच्या पहाऱ्यात!

राकेश लोहार

सोनं-चांदीच्या दराने दररोज उसळी घेतली तरी त्यांना एक मर्यादा आहे. पण, मुंबईत सध्या नगरसेवकांचा भाव त्या मर्यादेपलीकडे गेला आहे. इतके मौल्यवान नगरसेवक झालेत की, त्यांना जनतेच्या वॉर्डात नव्हे, तर पंचतारांकित हॉटेलच्या पहाऱ्यात ठेवावं लागतंय. लोकशाहीचा कणा मानले जाणारे लोकप्रतिनिधी आज लोकांपासून दूर, बंद दाराआड सुरक्षित ठेवले जात आहेत. आणि आता तिथे सगळं 'ओके' सुरू आहे. आकडेमोड, फोनाफोनी, आश्वासनांची देवाणघेवाण आणि सत्तेचा सौदा.

एका बाजूला देवाचा धावा सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला देवालाही न कळणारी समीकरणं आकार घेत आहेत, अशा हालचाली सुरू आहेत. राजकीय महाभारत रंगात आलंय, पण इथे ना कृष्ण आहे, ना गीता. धर्माचं पारडं हलकं करण्याची कुणालाच घाई नाही. इथे सगळ्यांची तलवार एकाच दिशेने रोखलेली आहे; ती दिशा आहे- सत्तेची.

मुंबईचा महापौर कोण होणार, या प्रश्नावरून सध्या मुंबई रणांगण बनली आहे. चर्चा विकासाची नाही, मुंबईकरांच्या प्रश्नांची नाही, तर आकड्यांची आहे. किती फुटले, किती जुळले, कुणी कुणाला हॉटेलमध्ये ठेवलं, कुणी कुणाला बाहेर काढलं, हीच खरी बातमी झाली आहे. लोकशाहीत बहुमत महत्त्वाचं असतं, हे आपल्याला शिकवलं जातं. पण, गेल्या काही वर्षांत बहुमत तयार करताना ज्या कोलांटउड्या राजकीय नेत्यांनी मारल्या आहेत, त्याने सामान्य मतदाराला भोवळ येणं स्वाभाविक आहे, अशी अवस्था राजकारणाची झाली आहे.



आज महाराष्ट्रात असं एकही राजकीय समीकरण उरलेलं नाही, जे पडताळून पाहिलं गेलेलं नाही. विचारधारा, नैतिकता, जनादेश हे शब्द फक्त भाषणापुरते उरलेत. प्रत्यक्षात 'हे होऊ शकत नाही' असं काहीच राहिलेलं नाही. कल्पनेपलीकडची युती, अनपेक्षित फोडाफोडी आणि कालपर्यंत एकमेकांचे कट्टर विरोधक आज गळ्यात गळे घालून उभे हे सगळं इतक्या वेळा घडलंय की आता धक्का बसायचाही प्रश्न उरलेला नाही. हे राजकारण पाहताना कधी कधी वाटतं, आपण राजकीय आयपीएल पाहतोय की काय! निवडणुकीत कोणता खेळाडू कुठल्या संघात होता, हे समजणं कठीण झालंय. आता कोण कोणासोबत खेळेल, याचा अंदाज बांधणं अशक्य आहे. जर्सी बदलणं इतकं सहज झालंय की, प्रेक्षक म्हणजेच मतदार गोंधळून गेले आहेत.

मुंबईच्या महापौरपदासाठी पुन्हा तोच खेळ सुरू झाला आहे का? सत्तेसाठीची ही आकडेमोड म्हणजे महाराष्ट्राच्या सत्ताकारणाचा नवा अंक लिहिला जातोय का? या अंकात मुंबईचा पहिला नागरिक केवळ पहिला मोहरा ठरतोय का, हा प्रश्न अधिक अस्वस्थ करणारा आहे. सत्तेच्या सारीपाटावर चाल कुणी टाकायची, कुणाला पुढे करायचं, कुणाचा बळी द्यायचा, याचाच हिशेब मांडला जातोय, अशी चर्चा जोरात आहे. शह-काटशहाचा डाव रंगतोय, पण या खेळात जनता केवळ प्रेक्षक म्हणून पाहात आहे.

राजकारणात डावपेच अपरिहार्य असतात, हे मान्य. पण जेव्हा हे डावपेच उघड उघड ओरड बनतात, तेव्हा लोकशाहीचा आत्मा गुदमरतो. सत्तेसाठीची झुंज उद्याच्या कारभारावर भारी पडू नये, हीच अपेक्षा आहे. कारण हेच चेहरे, हेच नेते उद्या पुन्हा आपल्या दारात येणार आहेत- 'आम्ही तुमच्यासाठी लढलो', 'आम्ही शब्द दिला होता' असं सांगत. प्रश्न इतकाच आहे की, जनमताचा हा अनादर किती काळ चालणार? आणि, या सगळ्या घडामोडी म्हणजे एखाद्या नव्या राजकीय भूकंपाचे संकेत तर नाहीत ना? मुंबईपासून महाराष्ट्रापर्यंत, सत्तेच्या हालचाली जमिनीखालून जाणवायला लागल्या आहेत. आता फक्त हादरा कधी बसतो, याचीच उत्सुकता उरली आहे. या सगळ्या सत्तानाट्याचा परिणाम फक्त मुंबईपुरता मर्यादित राहणार नाही, हे लक्षात घ्यायला हवं. कारण, पुढच्या वळणावर जिल्हा परिषद निवडणुका उभ्या आहेत. आज महापौरपदासाठी जी फोडाफोडी, आकडेमोड आणि सत्तेसाठीची बेफिकीर धावपळ सुरू आहे, तीच प्रयोगशाळा उद्याच्या जिल्हा परिषद निवडणुकांसाठी तयार केली जात आहे का, हा प्रश्न गंभीर आहे.

आज मुंबईत जे घडतंय, तेच मॉडेल उद्या ग्रामीण महाराष्ट्रात उतरवण्याची तयारी तर नाही ना, अशी शंका सामान्य मतदाराच्या मनात निर्माण होते. म्हणूनच सावध राहण्याची हीच वेळ आहे. कारण, एकदा लोकशाहीचे नियम वाकवण्याची सवय लागली, की निवडणुका फक्त प्रक्रिया उरतात आणि जनमत केवळ अडथळा बनतं. जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्तेचे हे प्रयोग थांबणार नसतील, तर ग्रामीण भागातही 'हॉटेल पॉलिटिक्स'चे नवे अध्याय उघडले जातील, आणि त्याची किंमत पुन्हा एकदा सामान्य मतदारालाच मोजावी लागेल.

लोकसंसद

## ट्रम्प यांची अरेरावी ग्रीनलँडवर डोळा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अरेरावी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अमेरिकेने तेलासाठ्यासाठी व्हेनेझुएला या छोट्याशा देशावर अरेरावी करून त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण करून त्यांना अटक केली आणि स्वतःला व्हेनेझुएला या देशाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर त्यांनी इराणमधील आंदोलनांना हवा देऊन तो देश अस्थिर करण्याचा डाव आखला इतकेच नाही तर इराणवर अमेरिका मोठा हल्ला करेल आणि इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी यांना पदच्युत करण्याची धमकी देऊन त्या देशावर अरेरावी केली. अमेरिकेच्या या अरेरावीचा संपूर्ण जग निषेध करत असतानाच ट्रम्प यांची नजर अमेरिकेचा शेजारी असलेला ग्रीनलँड या छोट्या देशावर पडली आणि हा देश देखील आपल्या घशात घालण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आणि ग्रीनलँड हा अमेरिकेचाच एक भाग असून लवकरच ग्रीनलँड हे अमेरिकेतील नवे राज्य असेल अशी घोषणा केली. ग्रीनलँडने स्वतःहून अमेरिकेत विलीन व्हावे आणि जर ग्रीनलँड स्वतःहून अमेरिकेत विलीन झाला नाही तर अमेरिका लष्करी बळ वापरून त्या देशाला अमेरिकेत विलीन करेल अशी धमकी दिली. इतकेच नाही तर जे देश ग्रीनलँडचे समर्थन करतील त्या देशांवर अमेरिका जबर आयात शुल्क अर्थात टेरिफ लावेल असा सज्जड दम देऊन त्यांना ब्लॅकमेल केले. ग्रीनलँडला समर्थन देणाऱ्या युरोपीय देशांना केलेले हे ब्लॅकमेलच आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या ब्लॅकमेली विरुद्ध युरोपात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. ट्रम्प यांच्या या अरेरावी विरुद्ध डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन आणि इतर शहरात हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आणि ग्रीनलँड हा विकाऊ देश नाही अशा घोषणा दिल्या. इंग्लंड, फ्रान्स या देशांनी देखील ट्रम्प यांच्या या धोरणावर टीका केली असून डोनाल्ड ट्रम्प यांनी ही अरेरावी थांबवावी असे निवेदन दिले आहे. केवळ युरोपच नव्हे तर संपूर्ण जग अमेरिकेच्या अरेरावी विरुद्ध एकजूट होत आहे. अमेरिकेतील नागरिकांनाही ट्रम्प यांचे हे विस्तारवादी धोरण मान्य नाही पण ट्रम्प आपली हेकेखोरी सोडायला तयार नाही. काहीही करून आपल्या शेजारी असलेल्या लहान देशांना अमेरिकेत विलीन करून घ्यायचे, तेल संपन्न राष्ट्रांवर ताबा मिळवून तेथील तेलासाठे ताब्यात घ्यायचे तसेच जे आपले ऐकणार नाही त्यांच्यावर जबर आयात शुल्क अर्थात टेरीफ लावून त्यांना ब्लॅकमेल करायचे आणि संपूर्ण जगावर आपली एकहाती हुकूमत गाजवायची हे ट्रम्प यांचे धोरण आहे आणि ट्रम्प यांचे हेच विस्तारवादी धोरण जगाला युद्धाच्या खाईत घेऊन जाईल हे मात्र नक्की.

**– श्याम ठाणेदार**

दिनविशेष

# मराठी भाषेतील अग्रणी कवी 'माधव त्र्यंबक पटवर्धन'

२१ जानेवारी १८९४ रोजी बडोदा येथे डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव ज्यूलियन यांचा जन्म झाला. कवी माधव यांनी पटवर्धन ऐवजी ज्यूलियन नाव लावण्यामागे दोन आख्यायिका ऐकायला मिळतात. इंग्लिश कवी शेले याने रचलेल्या ज्यूलियन आणि मडालो या कवितेवरून त्यांनी ज्यूलियन असे टोपणनाव धारण केले. याशिवाय 'गॉड्ज गुड मेनफ या कादंबरीतील नायिका ज्यूलियन या व्यक्तिरेखेवरून माधवरावांनी ज्यूलियन हे नाव घेतले, असेही सांगितले जाते. १९१६ मध्ये माधव पटवर्धन यांनी फारसी भाषा हा विशेष विषय निवडून बी.ए.ची पदवी मिळवली. त्यानंतर १९१८ मध्ये इंग्रजी साहित्य या विषयात त्यांनी एम.ए.चा पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९१८ ते १९२४ या कालावधीत ते फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे फारसी भाषा शिकवू लागले. त्यानंतर कोल्हापूरमधील राजाराम महाविद्यालयात ते फारसी भाषेचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. १९२५ ते १९३९ या कालावधीत त्यांनी तेथे अध्यापनाचे कार्य केले. दरम्यान, १ डिसेंबर १९३८ रोजी माधव त्र्यंबक पटवर्धन यांना त्यांच्या ङ्गछंदोरचनाफ या ग्रंथासाठी मुंबई विद्यापीठाने डी. लिट. ही पदवी देत कवी माधव ज्यूलियन यांचा सन्मान केला. गझल आणि रुबाई हे काव्यप्रकार फारसीमधून मराठीत आणण्याचे श्रेय कवी माधव ज्यूलियन यांना दिले जाते. माधव ज्यूलियन यांनी 'दित्जू', 'मा.जू' आणि ङ्गएम. ज्यूलियनफ या नावानेसुद्धा लेखन केले आहे. यापैकी काही लिखाण त्यांनी इंग्रजीमध्ये केले आहे. एवढेच नाही तर कविवर्य भा.रा.तांबे यांच्या कवितांचे संकलन आणि संपादन सुद्धा माधव ज्यूलियन यांनी केले. उत्कृष्ट संपादनाचा एक नमुना म्हणून याकडे पाहिले जाते. कवितांशिवाय माधव ज्यूलियन यांनी भाषाशास्त्रीय लेखन सुद्धा केले. ते नेहमीच सोप्या व शुद्ध मराठीचा पुरस्कार करत आणि म्हणूनच त्यांनी भाषाशुद्धी-विवेक हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथात कालबाह्य ठरलेल्या शेकडो मराठी शब्दांची सूची समाविष्ट करण्यात आली आहे. त्यांच्या एकूण प्रकाशित साहित्यामध्ये स्फुट गझला, खंडकाव्य, दीर्घकाव्य, काव्यसंग्रह, अनुवादित लेख, संशोधनात्मक व भाषांतरीत वाङ्मय प्रकारांचासुद्धा समावेश आहे. त्यांच्या प्रकाशित कवितांपैकी 'कशासाठी पोटासाठी', 'जीव तुला लोभला माझ्यावरी', 'प्रेम कोणीही करीना', 'प्रेमस्वरूप आई', 'मराठी असे आमुची मायबोली' या कविता खूपच प्रसिद्ध आहेत. १९३३ साली नाशिक येथे पार पडलेल्या कविसंमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषवले होते, तर १९३४ रोजी बडोदे येथे झालेल्या साहित्य संमेलनात ते कविशाखेचे अध्यक्ष होते. १९३६ मध्ये जळगाव येथे आयोजित मराठी साहित्य संमेलनाचे सुद्धा कवी माधव ज्यूलियन यांनी अध्यक्षपद भूषवले होते. २९ नोव्हेंबर १९३९ रोजी कवी माधव ज्यूलियन यांनी जगाचा निरोप घेतला. माधव ज्यूलियन यांच्या पहिल्या स्मृतिदिनाला मुंबई आकाशवाणीवरून एक संगितिका प्रसारित करण्यात आली होतीच. जिचे लेखन आणि दिग्दर्शन कवी बा. सी. मर्ढेकर यांनी केले होते. एका कवीने दुसऱ्या कवीला केलेला हा एक मानाचा मुजराच समजला जातो.

इ.स. १९३३मध्ये नाशिक येथे झालेल्या कविसंमेलनाचे माधव ज्युलियन यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. इ.स. १९३४ मध्ये बडोदे येथे झालेल्या साहित्यसंमेलनात ते कविशाखेचे अध्यक्ष होते. इ.स. १९३६मध्ये जळगाव येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुण्यातल्या टिळक रोडवरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहाला ममाधवराव पटवर्धन सभागृहफ असे नाव देण्यात आले आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२१ जानेवारी**

१) श्री.हरिश्चंद्र शंकर गुंजाळ मु.आवास, अलिबाग, रायगड दि.२१-१-१९४०

२)कोळीळाबेन गिरीशभाई पटेल अलिबाग दि.२१-१-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**मोहम्मद ताहीर तौफिक मुमेरे, वाढदिवस अलिबाग**

# रोहा-तांबडी रस्त्याची दुरवस्था

## ● स्थानिकांचा खड्ड्यांतून खडतर प्रवास; निवडणुकीच्या तोंडावरही रस्त्याकडे दुर्लक्ष

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तांबडीबारशेत रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. संपूर्ण रस्ता खड्डे व दगडांच्या साम्राज्यात बदलला आहे. तब्बल दहा किलोमीटरच्या या रस्त्यावर डांबरीकरणाचा कुठलाही थर दिसून येत नसल्याने वाहनचालक, प्रवासी व स्थानिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



या रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी, कष्टकरी शेतकरी, कामगार वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक लालपरीसह अन्य वाहनांतून नियमित प्रवास करतात. मात्र रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर आहे की, रोजचा प्रवास नाहक त्रासदायक ठरत आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांचे बिगुल वाजले असतानाही या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची साधी मलमपट्टीसुद्धा करण्यात आलेली नाही. त्यामुळे या परिसरातील सुमारे २५०० ते ३००० मतदार राजांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून त्याचा थेट परिणाम येणाऱ्या निवडणुकांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

रस्त्यालगत तांबडी बुद्रुक, निवी ठाकरवाडी, सवाने, बारशेत गौळवाडी, म्हासाडी, वाली तसेच कारिवणे ही गावे येतात. या गावांतील नागरिकांना रोहा बाजारपेठ, शासकीय कार्यालये, दवाखाने व इतर कामांसाठी याच रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची दुरुस्ती झाली आहे की नाही, असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

या रस्त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता रोहा विजय बागुल त्यांनी सांगितले की, टेंडर पास झालेला आहे. परंतु, आचारसंहिता लागल्यामुळे काम चालू करता येत नाही. थोडी आचारसंहितेला शितलता भेटली की, लगेच काम चालू करण्यात येईल. रस्ता चार किलोमीटर आम्ही तयार करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली.

### रस्ता नसेल तर मत नाही

राजकीय नेते निवडणुकीच्या काळात फक्त मतांची मागणी करण्यासाठी येतात. मात्र नागरिकांच्या दैनंदिन अडचणी आणि रस्त्याची दयनीय अवस्था पाहण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसल्याची तीव्र भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे यावेळी 'रस्ता नसेल तर मत नाही', अशी भूमिका मतदार राजा घेण्याची शक्यता आहे. दरम्यान, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डेमुक्त व सुरक्षित करण्यात यावा, अशी जोरदार मागणी प्रवासी वर्ग व स्थानिक नागरिकांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात येत आहे.

## शरद कळमकर यांचे निधन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील खांब कोलाड विभागातील पुगाव गावचे सामाजिक कार्यकर्ते शरद नारायण कळमकर यांचे वयाच्या ६५ वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, दोन भाऊ, भावजय, पुतणे, सुना आणि नातवंडे असा मोठा कळमकर परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.२६ जानेवारी रोजी तर उत्तरकार्य गुरुवार दि.२९ जानेवारी रोजी त्यांच्या राहत्या निवासस्थानी होणार आहेत.



## तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात



**। खांब । प्रतिनिधी ।**

रा.जि. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ अंतर्गत रोहा तालुका मुख्याध्यापक संघाच्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा सोमवारी (दि.१९) कोएसो मेहेंदळे हायस्कूल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

कोएसो मेहेंदळे हायस्कूल आर.एस.मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या स्पर्धेप्रसंगी संघाचे सचिव विनय मार्गे, सदस्य सुरेश जंगम, नागोठणे हायस्कूल मुख्याध्यापक डि.एस.पवार आदी प्रमुख मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या स्पर्धेत इ.५ वी ते ७ वी गटामध्ये प्रथम क्र. सोनावणे अनुष्का विजय, द्वितीय क्रमांक गायकर मानवी भास्कर व तृतीय क्रमांक म्हात्रे आराध्य प्रफुल्ल तसेच इ.८ वी ते १० वी गट प्रथम क्रमांक उभारे विश्व जनार्दन, द्वितीय क्रमांक अधिकारी तनुष्का व तृतीय क्रमांक मासक श्रवण शरद याने पटकाविला. ११ वी/१२ वी गटामध्ये प्रथम क्रमांक मांडलेकर रूणाली चंद्रकांत व द्वितीय क्रमांक पिंपळे नील नेहाल यांनी

पटकावले. या स्पर्धेचे स्पर्धा नियोजन प्रमुख म्हणून के.आर. पाटील यांनी काम पाहिले. तर स्पर्धा प्रमुख टी.यू. पाटील यांनी उत्तम पद्धतीने कामगिरी बजावली. तर परीक्षण नंदकुमार मरवडे, विजय चौधरी, वैशाली पसावे यांनी केले.

## भाग्यश्री गोविलकर यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील रहिवासी भाग्यश्री भागोजी गोविलकर यांचे शनिवारी (दि.१७) वयाच्या ४७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, दीर, बहिणी, पुतणे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.२६ जानेवारी तर अंतिम धार्मिक विधी बुधवार दि.२८ जानेवारी रोजी होणार आहेत, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.



## खासगी बसला भीषण आग



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मालाड पूर्वेकडील वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर एका खासगी बसला अचानक आग लागली. ही घटना मंगळवारी (दि.२०) सकाळी ९.३० ते १० च्या सुमारास घडली. ही बस मुंबईहून उज्जैनकडे जात असल्याची माहिती मिळत आहे. प्रवाशांनी भरलेल्या या बसने अचानक पेट घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र चालक व वाहकाच्या सतर्कतेमुळे आणि तात्काळ केलेल्या कारवाईमुळे बसमधील सर्व प्रवाशांना वेळेत सुरक्षित स्थळी हलवण्यात यश आलं. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस, अग्निशमन दल, पोलीस प्रशासन, मेट्रो प्रशासन आणि १०८ रुग्णवाहिका सेवेची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. या आगीमुळे वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील दोन्ही बाजूंची वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे विस्कळीत झाली होती. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.

## चंद्रकांत भोईर यांना डॉक्टरेट पदवी

**पनवेल :** पनवेल-पळस्पे ग्रामपंचायतचे माजी सरपंच चंद्रकांत अर्जुन भोईर यांना अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हरसिटीतर्फे गेली ४० वर्षे केलेल्या सामाजिक कार्याची दाखल घेऊन डॉक्टरेट ही पदवी बहाल केली. एका भव्य समारंभामध्ये ही डॉक्टरेट पदवी चंद्रकांत भोईर यांना बहाल करण्यात आली. चंद्रकांत भोईर यांचे गेल्या ४० वर्षातील सामाजिक आणि शैक्षणिक काम मोठे आहे. खेळाडू म्हणून कारकीर्द सुरू करून पुढे आदर्श सरपंच व संवेदनशील लोकनेता म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे चंद्रकांत भोईर हे सर्वसामान्य जनतेचे खरे अर्थाने आधारवड ठरले आहेत. सामाजिक बांधिलकी, विकासात्मक दृष्टीकोन, दानशूर वृत्ती आणि माणुसकीची जाणीव यांचा संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. त्यांच्या लोककल्याणकारी कार्याला या मानद डॉक्टरेट पुरस्काराने आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. भोईर यांना मिळालेल्या पदवीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.




## बॅनर-फुलांपेक्षा पुस्तक भारी : वनश्री शेडगे

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रोहा नगरपालिकेच्या नुतन नगराध्यक्षा वनश्री समिर शेडगे यांच्या वाढदिवसानिमित्त २१ जानेवारी रोजी एक आगळा-वेगळा आणि समाजाला दिशा देणारा उपक्रम राबविण्यात येत आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना बॅनर, पोस्टर्स किंवा पुष्पगुच्छ न देता पुस्तके भेट म्हणून द्यावीत, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे. दिखाव्यापेक्षा ज्ञानाला प्राधान्य देणारा हा उपक्रम समाजातील वाचन संस्कृतीला चालना देणारा असून सामाजिक बांधिलकी जपणारा आहे.



आजच्या आधुनिक आणि स्पर्धात्मक युगात बाह्य प्रदर्शनाऐवजी वैचारिक संपन्नतेला महत्त्व देणे अत्यंत गरजेचे आहे. बॅनर व फुलांपेक्षा पुस्तक अधिक मोलाचे ठरते, कारण पुस्तकातूनच विचारांची समृद्धी, व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि खऱ्या अर्थाने प्रगती घडते. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून ते समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तक दिले की त्यांच्या मनात स्वप्नांची बीजे रोवली जातात, विचारांना योग्य दिशा मिळते आणि उज्ज्वल भविष्य घडविण्याची क्षमता निर्माण होते. वाचनातून आत्मविश्वास वाढतो, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो आणि जबाबदार, संवेदनशील नागरिक घडतात.

त्यामुळे बॅनर-फुलांपेक्षा पुस्तक भारी हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता तो सकारात्मक बदल घडविणारा विचार बनतो. वनश्री शेडगे यांनी दिलेला हा आदर्श प्रेरणादायी असून, त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## निवृत्त प्राध्यापकाची फसवणूक

### डिजिटल अरेस्टची भीती दाखवत लुटले

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

दापोली तालुक्यातील एका उच्चशिक्षित माजी प्राध्यापकाला डिजिटल अरेस्टची भीती दाखवत त्यांच्याकडून तब्बल १ कोटी २३ लाख उकळण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. तुमच्या बँक खात्यातून ३ कोटींचा फ्रॉड झाला आहे, अशी बतावणी करून तोतया सीबीआय आणि पोलीस अधिकाऱ्यांनी हे कृत्य केले आहे. याप्रकरणी ३ संशयितांविरोधात दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दापोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दापोली येथील डॉ. मकरंद श्रीनिवास जोशी (६२) हे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ येथून विस्तार शिक्षण संचालक पदावरून नुकतेच निवृत्त झाले आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांना ४ नोव्हेंबर २०२५ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत मोबाईलवर संपर्क साधून आपण बंगळुरू पोलीस आणि नवी दिल्ली येथील सीबीआय अधिकारी असल्याचे भासवले.

जोशी यांच्या नावे कॅनरा बँक शाखा माटुंगा (मुंबई) येथे खाते असून त्यात ३ कोटी रुपयांचा फ्रॉड झाला असल्याची बतावणी केली. तसेच त्यांना ५० लाख रुपये दंड भरावा लागेल, असं सांगत डिजिटल अरेस्ट करण्याची भीती दाखवण्यात आली.

अटकेच्या भीतीने मकरंद जोशी यांनी आरोपींनी सांगितलेल्या ॲक्सिस बँक (तुळजापूर), आयडीएफसी बँक (मुंबई) आणि आयसीआयसीआय बँक (वाशी) या विविध बँक खात्यांमध्ये वेळोवेळी एकूण १ कोटी २३ लाख रुपये भरले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी तीन आरोपींविरोधात दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सोन्याची तस्करी करणाऱ्यांना अटक

**मुंबई :** सोन्याची तस्करी करणाऱ्या बांगलादेशी नागरिकासह एका विमानतळ कर्मचाऱ्याला सीमा शुल्क विभागाने अटक केली आहे. त्या दोघांकडून १५९० ग्रॅम सोने जप्त करण्यात आली आहे. जप्त केलेल्या सोन्याची किंमत सुमारे २ कोटी १५ लाख रुपये इतकी आहे. शनिवारी एका खासगी विमानाने बांगलादेशी नागरिक छ. शिवाजी महाराज विमानतळावर आला. त्याने सोन्याची भुकटी असलेली चार पाकिटे विमानतळावरील कर्मचाऱ्याला देत असताना पकडले.

**देवस्थान ट्रस्टकडून जय्यत तयारी** | **भाविकांसाठी चोख व्यवस्था**

# माघी गणेशोत्सवासाठी पालीनगरी सजली

**। पाली । प्रतिनिधी ।**

पालीच्या श्री बल्लाळेश्वराचा माघी गणेशोत्सव यावर्षी शनिवार दि.१९ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान होत आहे. त्यानिमित्ताने लाखो भाविक महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून आपल्या गणरायाचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी पालीत येतात. त्या नागरिकांना चागल्या सोयी सुविधा मिळाव्यात, यासाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट सज्ज झाली आहे. याबाबत सुधागड तालुक्याचे तहसीलदार उत्तम कुंभार, पाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर, पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष सर्व प्रशासकीय अधिकारी तसेच बल्लाळेश्वर संस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे व पदाधिकारी यांच्या नियोजनाखाली हा सोहळा संपन्न होणार आहे.



यावेळी पोलीस प्रशासन चोख बंदोबस्त ठेवणार असून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे. राज्य परिवहन मंडळाकडून जादा गाड्यांची सोय करण्यात आली असून त्याचे आरक्षण पाली बस स्थानक तसेच मंदिर परिसरात देखील एक विशेष सोय करण्यात आली आहे. महावितरण विभागाकडून विशेष मेहनत घेण्यात येत आहे. उत्सवाच्या कालावधीत वीज जाणार नाही तसेच रस्त्यावर जी दुकाने यात्रेत मांडली जाणार आहेत, त्यांना तात्पुरत्या स्वरुपात वीज कनेक्शन देण्यात येणार असून कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. आरोग्य तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कमर्चारी यांचे सहकार्य असून त्यांनी देखील या जत्रेसाठी विशेष नियोजन केले. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घेणार येणार आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठी तसेच या कालावधीत स्वच्छता राहावी म्हणून नगरपंचायतीकडून जागोजागी कचराकुंड्या उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच फिरते शौचालयाची देखील सोय करण्यात आली असल्याचे समजते.

### मोफत नाश्ता, प्रसादाचे वाटप

मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सोयीसाठी विशेष मेहनत घेतली आहे. भाविकांना रांगेत उभे असताना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सावलीची सोय तसेच भाविकांसाठी मोफत नाश्ता आणि प्रसादाची सोय करण्यात आली आहे. याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे सरपंच जितेंद्र गद्रे यांनी केले आहे. या कालावधीत गावातील ट्रफिक रोखण्यासाठी मोठ्या गाडयांची वाहतूक गावाबाहेर, उंबरवाडी तसेच प्राजक्ता हॉटेल समोर करण्यात आली आहे. तेथून भाविकांच्या सोयीसाठी देवस्थानच्या वतीने रिक्षांची मोफत सोय मंदिर पार्किंगपर्यंत करण्यात आली आहे.

# निवडक

## चंद्रकांत लोखंडे यांचा सन्मान



**कोलाड :** बळीराजा शेतकरी सामाजिक संस्थेचा ६ वा वर्धापन दिन व शेतकरी मार्गदर्शन मेळावा रविवारी (दि.१८) रोहा येथील कन्या शाळेत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आंबेवाडी येथील शेतकरी चंद्रकांत गणपत लोखंडे यांना प्रगतशील शेतकरी म्हणून प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. चंद्रकांत लोखंडे यांनी भात शेतीसोबत फळझाडे, कडधान्य, भाजीपाला तसेच दुबार पिकांचे यशस्वी उत्पादन करून आधुनिक फरसबाग मॉडेल तयार करून, सेंद्रिय विषमुक्त शेती पद्धतीचा अवलंब करत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत बळीराजा शेतकरी सामाजिक संस्थेने त्यांना शेतकरी नेते महाराष्ट्र, मा. रघुनाथ दादा पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय पाशिलकर, उपाध्यक्ष शिवाजी मुटके, कृषी अधिकारी रणजीत लवटे, रायगड जिल्हाध्यक्ष रघुनाथ कडू, दगडू बामुगडे, तुकाराम सानप, अनिल लाड तसेच जिल्हा महिला अध्यक्षा वर्षा जांभेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीकडे वळवण्यासाठी तसेच नव्या पिढीला शेतीकडे आकर्षित करण्याचा संदेश देण्यात आला.

## मंगलमूर्ती प्रतिष्ठानतर्फे माघी गणेशोत्सव

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरले येथील मंगलमूर्ती प्रतिष्ठानतर्फे मंगलमूर्ती निवासस्थानाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या गणपती मंदिरात गुरुवार दि.२२ रोजी माघी गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरू असून, रणजीत माळी, सुविचार माळी, शंकर माळी, मीनल माळी, सुजय माळी, प्रणिश गोंधळी, मृगमय माळी, विघ्नेश माळी, आयान माळी, स्वरा माळी, श्राव्या माळी, दिव्यांश माळी यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली हा माघी गणेशोत्सव साजरा होत आहे. उत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर देण्यात आला आहे. यामध्ये गुरुवारी गणेश जयंतीच्या मुख्य दिवशी सकाळी महाअभिषेक व महापूजा होईल. त्यानंतर १०:३० वाजता रामकृष्ण हरिपाठ मंडळ चिरले यांच्या हरिपाठाचा कार्यक्रम होईल. दुपारी बारा वाजता गायिका मनस्वी माळी हिच्या सुरावटीतून श्री गणेश जन्मोत्सवाच्या पाळणा गीताचे सादरीकरण व महाआरतीचा कार्यक्रम होईल. तदनंतर महाप्रसादाला सुरुवात होईल. यानंतर गायिका मनस्वी माळी, पारस वर्तक यांची भक्ती गीते ऐकावयास मिळणार आहेत. यावेळी मृग्मय माळी, पखवाज वादक म्हणून तर प्रणेश म्हात्रे बासरीच्या माध्यमातून साथसंगत करतील.



## महेंद्र घरत पुरस्काराने सन्मानित




**चिरनेर :** हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या मानिवली येथील जन्मगावी ११२ व्या जयंतीचे सोमवारी (दि.१९) आयोजन करण्यात आले होते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या हिराजी गोमाजी पाटील यांच्या जयंतीचा सोहळा आगरी समाज संघटनेच्या वतीने थाटात साजरा करण्यात आला. यावेळी महेंद्र घरत यांच्या समाजकार्याची दखल घेत, कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने त्यांना आगरी समाज भूषण पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. महेंद्र घरत सत्काराला उत्तर देताना, समाजातील प्रत्येक गरजूंसाठी सहकार्याची भूमिका कायम असल्याचे सांगितले. त्यांनी गेली ३८ वर्षे सामाजिक काम करत हजारोंच्या हातांना काम दिले. शेकडो गरीब-गरजूंना घर बांधकामासाठी मदत केली. रुग्णांसाठी तर ते देवदूतासमान काम करीत आहेत. शेकडो विद्यार्थी दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा खर्चही उचललेला आहे. ज्या पालकांना लाखो रुपये फी भरून इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेता येत नाही, त्यांच्यासाठी आईच्या नावाने यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्था स्थापन करून अत्यल्प फी घेऊन शाळा आणि ज्युनियर महाविद्यालय चालवले जाते. संगणक आणि रुग्णवाहिकांचे वाटप आज घडीलाही सुरू असल्याचे त्यांनी भाषणातून सांगितले.

## महिला शेतकऱ्यांसाठी मुंबईत चर्चासत्र

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाने आणि एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला शेतकऱ्यांच्या विविध विषयाच्या अनुषंगाने दि.२३ जानेवारी रोजी चर्चा सत्र होणार आहे. या चर्चा सत्राचे उद्घाटन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्य कृषी मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हॉल क्रमांक ४ येथे होणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाने आणि एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्यात आणि महिला सक्षमीकरण, संसाधन हक्क, पोषण सुरक्षा, लिंग न्याय, पर्यावरणीय शाश्वतता आणि शेतकरी समृद्धी मजबूत करण्यासाठी मदत करणारे व्यापक धोरण तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणी कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी संयुक्तपणे सामंजस्य करार केला आहे. या करारातंर्गत शेतकरी महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमातंर्गत या विविध विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चा सत्राला कृषि विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामीनाथन, कुमारीबाई, व्दारकाताई, सल्लागार समितीचे डॉ. गोविंद केळकर, सीमा कुलकर्णी, एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक डॉ. आर. रेंगलक्ष्मी, मीरा सौदरराजन यांची व्याख्याने होणार आहेत. हे चर्चा सत्र सकाळी १० ते २ या वेळेत होणार आहे.

## अपार आयडीसाठी मुदतवाढ

**रत्नागिरी :** सर्व प्रवेश पूर्व परीक्षेसाठी अपार आयडी बंधनकारक आहे. अपार आयडी नसेल तर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा अर्जच भरता येणार नाही. त्यामुळे शिक्षण विभागाकडून अपार आयडी तयार करण्यासाठी शाळांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. रत्नागिरी जिल्ह्यात मात्र अपार आयडी तयार करण्याचे काम ९२.७२ टक्के पूर्ण झाले आहे. अपार आयडी प्रक्रियेत आधार प्रमाणीकरण हा मोठा अडथळा ठरत आहे. आधार पडताळणी, नाव व जन्मतारीख न जुळणे तसेच पालकांची संमती न मिळणे या कारणामुळे अपार आयडी तयार करण्यात अडचणी येत आहेत. तरी जिल्ह्यातील बहुतांश शाळांना या अडचणीवर मात करीत ९२.७२ टक्के कामाची पूर्तता करण्यात आली आहे. राज्यातील काही जिल्ह्यात अद्याप विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार झालेले नसल्यामुळे शासनाकडून दि.३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

# कल्याण-मुरुड एसटीची भंगारवस्था

## प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर, मुरुड डेपो नवीन गाड्यांपासून अद्याप वंचित

**| मुरुड | प्रतिनिधी |**

कल्याण येथून मुरुडकडे सुटलेली मुरुड डेपोची एसटी बस अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी बसच्या दुरवस्थेचे फोटो काढून ते सोशल मीडियावर प्रसारित केल्याने एसटी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मुरुड आगाराला भंगार गोडाऊनचे रुप तयार झाले आहे. हा आगार अजून नवीन गाड्यापासून वंचित का? असा सवाल प्रवाशीवर्गाकडून केला जात आहे.

मुरुड डेपोला नवीन बस मिळणार असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र, प्रत्यक्षात आजही मुरुड डेपो नवीन गाड्यांपासून वंचितच आहे. विशेष म्हणजे, सीएनजी पंपच्या प्रतीक्षेत असलेल्या संबंधित पक्ष, यंत्रणा व विभागांनी या गाड्यांच्या दयनीय अवस्थेचा गांभीर्याने विचार करून प्राधान्यक्रमाने मागणी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. जर प्रवासी सुरक्षितपणे प्रवासच करू शकत





नसतील, तर केवळ श्रेयाची लढाई लढण्यासाठी प्रसिद्धीच्या बातम्या पेरणे कितपत योग्य आहे? असा रोखठोक सवालही त्यांनी उपस्थित केला.

या प्रकारामुळे ग्रामीण आणि तालुकास्तरावरील प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, एसटी महामंडळाने तातडीने या गाड्यांची तपासणी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच मुरुड डेपोला नवीन आणि सुरक्षित गाड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी प्रवासी व विविध संघटनांकडून होत आहे.

> बसची अवस्था पाहता ती रस्त्यावर धावण्यायोग्य आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा गाड्या बिनधास्तपणे प्रवाशांच्या जीवाशी खेळत रस्त्यावर कशा पाठवल्या जातात. अधिकाऱ्यांना लोकांच्या जिवाचे काहीच वाटत नाही का? अशा जीर्ण आणि असुरक्षित गाड्या प्रवाशांच्या सेवेत पाठवणे म्हणजे लोकांवर सूड उगवण्यासारखे आहे. -ॲड. मनिष माळी

दरम्यान, प्रशासन या गंभीर विषयाकडे कधी लक्ष देणार आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला कधी प्राधान्य देणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'पेन्शन वाढवून न दिल्यास आंदोलन'

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोह्यातील भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात रविवारी (दि.१८) रोजी झालेल्या पेन्शनर धारकांची भव्य सभा पार पडली.

ज्येष्ठ नागरिक कामगारांच्या ईपीएस ९५ पेन्शन वाढीसाठी अशोक राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय संघर्ष समिती गेली ९ वर्षे आपल्या हक्कासाठी लढा देत आहे. पेन्शनच्या माध्यमातून वर्षाला सुमारे ५८ हजार कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत जमा होतात. त्यापैकी पेन्शनधारक कामगारांना फक्त १३ हजार कोटी रुपये रक्कम वितरित केली जाते. मग ४५ हजार कोटी व्याज जाते कोठे? शासनाने कामगारांना आत्ता पर्यंत आश्वासना शिवाय काहीच दिले नाही. त्यामुळे फेब्रुवारी महिन्यापर्यंत बजेटमध्ये जर कामगारांच्या हक्काच्या



पेन्शनमध्ये वाढ दिली नाहीतर दिल्लीतील जंतरमंतर येथे राष्ट्रीय स्तरावर भव्य आंदोलन उभारले जाईल असा इशारा संघटक सुभाष पोखरकर यांनी दिला आहे.

ज्येष्ठ नागरिक कामगार सरकारकडे भिक मागत नाही. तर हक्काची पेन्शन वाढवून मागत आहोत. त्याचा संबंधित खात्याने त्वरित विचार करावे अशी देखील मागणी पेन्शनधारकांनी केली.

यावेळी रोहा अध्यक्ष मालू पांडू धसाडे, सुरेंद्र आगरकर, महादेव धसाडे, वसंत शेलार, नारायण पिंगळे, आत्माराम ठमके, नंदकुमार भादेकर, दिलीपराव कहाणे, इंद्रजित राजपुत आदी सुमारे ६५० ज्येष्ठ पेन्शनर बंधू-भगिनी उपस्थित होते.

## परसबाग स्पर्धेत चौल-सराई शाळेचे देदीप्यमान यश

**| चौल | प्रतिनिधी |**

सन २०२५२६ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या परसबाग स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील चौल-सराई येथील शाळेने उल्लेखनीय व प्रेरणादायी यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांनी परसबाग उपक्रमांतर्गत विविध भाजीपाला पिकांची लागवड केली. सेंद्रिय खतांचा वापर, पाणी व्यवस्थापन, रोपांची निगा, किडींपासून संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या उपक्रमाच्या पाहणीसाठी राजिप प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, जिप लेखापाल मोरे,




आंदोशी केंद्राचे केंद्रप्रमुख कृष्णकुमार शेळके, शाळेचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी के. आर. पिंगळा यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक करून परसबाग उपक्रमाचे महत्त्व विशद केले.

परसबाग निर्मितीमध्ये विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण शेळके, केंद्रप्रमुख कृष्णकुमार शेळके, मनोक कंटक, पराग पाटील, समता पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे यश संपादन झाले. या यशाबद्दल पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमींमधून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी शाळेला शुभेच्छा देण्यात येत आहेत. चौल-सराई शाळेचे हे यश इतर शाळांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

## राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यामध्ये (दि.१४) मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव रायगड-अलिबाग तेजस्विनी निराळे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलवित प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीकडील धरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था आदी प्रकरणे लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

यापूर्वी दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालत ५ हजार १६९ आणि वादपूर्व १२ हजार ७५१ असे एकूण १७ हजार ९२० प्रकरणे निकाली निघाली आहेत. त्यामुळे दि.१४ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरीकांनी सहकार्य करून या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आरसीएफच्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**| चौल | प्रतिनिधी |**

आरसीएफ, थळ येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेल्या आरसीएफ एक्स-एम्प्लॉईज सोशल फोरमचे चौथे वार्षिक स्नेहसंमेलन रविवारी (दि.१८) जानेवारी रोजी अलिबाग येथील आरसीएफ वसाहतीतील कम्युनिटी हॉलमध्ये उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास सुमारे ६५० सभासद पती-पत्नी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सभासदांच्या भजनी मंडळाच्या भजनाने झाली. सकाळी दहा वाजता प्रमुख पाहुणे नितीन हिरडे यांचे सपत्नीक आगमन झाले. राष्ट्रगीतानंतर दिवंगत सभासदांना भावपूर्ण



श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. फोरमचे अध्यक्ष रवींद्र वर्तक यांनी प्रास्ताविकात फोरमच्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला. सभासदांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचीही माहिती त्यांनी दिली.

यावेळी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सभासद पती-पत्नींचा श्री. व सौ. हिरडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच प्रमुख पाहुणे, उपस्थित महाप्रबंधक कोळी, काळबांडे, मंगेश व जनसंपर्क अधिकारी राकेश कवळे यांचे स्वागत करण्यात आले.

फोरमचे ज्येष्ठ सभासद प्रदीप नाईक यांची अलिबाग नगरपरिषदेवर स्वीकृत सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. नितीन हिरडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करत कंपनीच्या सर्वांगीण प्रगतीची माहिती दिली व फोरमला यापुढेही सहकार्य मिळत राहील, असे आश्वासन दिले. यानंतर गणेश शिंदे यांनी 'हे जीवन सुंदर आहे' या विषयावर ज्येष्ठ नागरिकांसाठी मार्गदर्शक व्याख्यान दिले. त्यांच्या नर्मविनोदी शैलीतील भाषणास उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

पानसरे यांनी पसायदान सादर केले, तर सुधीर सावंत यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश म्हात्रे यांनी केले. दुपारच्या सत्रात सभासद पती-पत्नींनी कराओकेवर आधारित हिंदी-मराठी गाण्यांचा कार्यक्रम सादर केला.

## फेरीवाल्यांचे सर्वेक्षण 'बायोमेट्रिक' करा

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची पालिकेकडे मागणी

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

फेरीवाल्यांचे सर्वेक्षण 'बायोमेट्रिक' पद्धतीने करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कामोठे शहर अध्यक्ष अजिनाथ सावंत यांनी पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी पत्राद्वारे केली आहे. सावंत यांनी दिलेल्या पत्रानुसार पालिकेच्या माध्यमातून ६ वर्षांपूर्वी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. पालिकेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची मुदत २०२४ मध्ये संपली आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार दर पाच वर्षा नंतर फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असते. २०१९ साली पहिल्यांदा करण्यात आलेल्या सर्वेक्षणानंतर जवळपास ६ वर्षे उलटली आहेत. त्यामुळे फेरीवल्यांचे नव्याने सर्वेक्षण करणे गरजेचे असल्याचे मत सावंत यांनी व्यक्त केले आहे.

मागील काही वर्षात पालिका क्षेत्रात फेरीवाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्यावतीने शहरातील फेरीवाले विक्रेत्यांचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करावे. नवीन सर्वेक्षणामुळे मागील सर्वेक्षणात 'फेरीवाला' म्हणून पुरावे सादर न करू शकलेल्यांना आणखी एक संधी मिळेल. त्याचबरोबर मागील प्रतिक्षायादीतील फेरीवाले परवान्यापासून वंचित राहणार नाहीत. मागील सर्वेक्षणामध्ये वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचा समावेश केला गेला नाही. अनेक फेरीवाल्यांचे अर्ज स्वीकारले गेले नाही. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत तरुणांना फेरीवाला सर्वेक्षणात नव्याने सामील करून त्यांना शहराच्या विविध भागात बिझनेस ऑन व्हील या संकल्पनेनुसार रोजगार संधी उपलब्ध करून असंघटीत व स्वयंरोजगार करणाऱ्या फेरीवाल्यांना व्यवसायाची संधी मिळावी. म्हणून फेरीवाल्यांचे पुन्हा एकदा योग्य पद्धतीने सर्वेक्षण करून आणि त्या पद्धतीने पुन्हा धोरणाची प्रक्रिया राबविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य कार्यवाही करण्यासंबंधी आदेश द्यावेत अशी विनंती करण्यात आली आहे.



• पंढरपूरचा सुप्रसिद्ध नंदी बैल 'शाम्या' पनवेलमध्ये दाखल होताच भाविकांची मोठी गर्दी उसळली. विठ्ठलाच्या नामस्मरणात वाढलेला हा नंदी आपल्या देखण्या रूपामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.( छायाचित्र : राजेश डांगळे)

## वाहनाच्या धडकेत इसम जखमी

पनवेल : अज्ञात वाहकाने दिलेल्या धडकेत एक ५४ वर्षीय इसम जखमी झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. फिर्यादी विष्णु जिबल (वय ५४, रा पनवेल) हे पळस्पे परिसरात असताना वाहन क्रमांक एमएच ४३ सी ई ६८३१ वरिल अज्ञात चालकाने त्याच्या वाहनाने विष्णु जिबल यांना जोरदार धडक दिली. या धडकेत विष्णु जिबल गंभीर जखमी झाले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### आर्थिक घटीमुळे अनेकदा फेऱ्या रद्द | टप्याटप्याने करावा लागतो प्रवास

## श्रीवर्धन-अलिबाग बसची वेळ गैरसोयीची

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन-अलिबाग एसटी बस आर्थिक उत्पन्नात घट या कारणास्तव श्रीवर्धन आगाराकडून अनेक वेळा बंद करण्यात येते. मात्र, श्रीवर्धन तालुक्यातील प्रवासी वर्गाने आगारप्रमुखांकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर श्रीवर्धन-अलिबाग बस ही काही दिवसांपूर्वी सुरू करण्यात आली आहे. परंतु, अलिबाग स्थानकातून परतीची वेळ ही प्रवासी वर्गाच्या दृष्टीने गैरसोयीची ठरत आहे.

१९८७ मध्ये श्रीवर्धन आगाराची स्थापना झाल्यापासून



श्रीवर्धन अलिबाग बससेवा सुरू आहे. पहाटे ५:४५ वाजता श्रीवर्धन येथून मार्गस्थ होणारी बस म्हसळा, माणगाव, वडखळ मार्गे अलिबाग येथे पोहोचते व सायंकाळी ६ वाजता श्रीवर्धनकडे परतीच्या प्रवासाला निघत असे प्रशासकीय कार्यालयांचे मुख्यालय अलिबागमध्ये असल्याने श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील सरकारी कर्मचारी आणि प्रवाशांसाठी ही बस उपयुक्त ठरत आहे.

काही दिवसांपूर्वी श्रीवर्धन अलिबाग बस पुन्हा सुरु करण्यात आली आहे. सकाळी ५:४५ वाजता मार्गस्थ होणाऱ्या या बसची परतीची वेळ ही दुपारी दोन वाजताची ठेवण्यात आली आहे. शासकीय कामानिमित्त आलेले कर्मचारी तसेच श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील प्रवासी वर्गाला ही वेळ गैरसोयीची ठरत आहे. अनेकदा शासकीय कामे पुर्ण होण्यास सायंकाळ होते. या कारणास्तव प्रवासी वर्गाला टप्याटप्याने प्रवास करीत यावे लागते. श्रीवर्धन आगाराची अलिबाग बस आमच्या सेवेसाठी नसून समाधानासाठी सुरू केली आहे अशी संतप्त प्रतिक्रिया श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील प्रवासी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

> अलिबाग स्थानकातून अलिबाग श्रीवर्धन अगोदर अलिबाग-पोलादपूर बस सुटते. त्यामुळे माणगाव पर्यंत श्रीवर्धन बसला प्रवासी मिळत नाहीत. प्रवाशां अभावी दोनची वेळ केली. वेळेत केलेल्या बदलामुळे प्रवासी वर्गाला बस सोयीस्कर झाल्याने उत्पन्नात वाढ झाली. - महिबूब मणेर, श्रीवर्धन आगारप्रमुख.

## गळफास घेऊन तरुणीची हत्या

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कोणत्या तरी अज्ञात कारणाने एका २५ वर्षीय तरुणीने फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. कांचन कश्यप असे मयत तरुणीचे नाव असून तिने करंजाडे येथील तिच्या राहते घरामध्ये कोणत्या तरी अज्ञात कारणाने फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## निवडक



### ओबीसी एकजूट दिनदर्शिकेचे प्रकाशन

**खरोशी** : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या ओबीसी एकजूट दिनदर्शिका २०२६ चे भव्य प्रकाशन पुणे येथे ओबीसी योद्धा ॲड. मंगेश ससाने यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्यभरातून ओबीसी समाजाचे प्रतिनिधी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओबीसी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, शैक्षणिक प्रगती, सामाजिक जागृती व संघटन बळकटीकरण या उद्देशाने ही दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे. यामध्ये महाज्योतीच्या सर्व योजनांचा समावेश करण्यात आला आहे. याकामी महाज्योतीच्या प्रकल्प संचालक सुवर्णा पगार यांचे विशेष योगदान लाभले. दिनदर्शिका बनविण्यासाठी राज्य सरचिटणीस संतोष भोजने, बबनराव चव्हाण, रेखा सुडे, श्रीराम पळसकर, सुवर्णा पगार, अभय पाटील, सुखदेव भालेकर, लहू राक्षे, आदी पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी श्रीराम पळसकर, एकनाथ मनदुमले, रुकेश राकेले, वैजनाथ सुरवसे, तसेच पुणे जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

### आमडोशी दासबोध सप्ताहाचे आयोजन

**सुकेळी** : नागोठणे जवळच असलेल्या सदानंदाश्रम मठ श्रीक्षेत्र आमडोशी येथे बुधवार दि.२१ ते शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी श्री. स. स. ताई महाराज यांची १२७ वी जयंती व अखंड दासबोध सप्ताहानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुदास अनंत यांच्या हस्ते या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या तीन दिवसांच्या कार्यक्रमांमध्ये अखंड दासबोध नाम सप्ताह प्रारंभ व उपस्थित मान्यवरांची प्रवचने होतील. शुक्रवार (दि.२३) जानेवारी रोजी काकड आरती व ध्यान, पंचामृत अभिषेक सोहळा दासबोध वाचन, मान्यवरांचे प्रवचन, माऊलींची आरती व दासबोध सप्ताह समाप्ती महाप्रसादाने या भव्यदिव्य कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आमडोशी येथील सदांनदाश्रम मठाचे मठाधिपती गुरूदास अनंत व गणेश जाधव यांनी केले आहे.

### प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान



**रोहा** : बळीराजा शेतकरी सामाजिक संस्थेच्यावतीने प्रयोगशील व यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आले. रविवारी (दि.१८) रोजी रोहा नगर पालिकेच्या कन्या शाळा येथे आयोजित कार्यक्रमा प्रसंगी शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत लोखंडे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रयोगशील आजीव सभासद शेतकरी म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आंबेवाडी भागातील शेतकरी चंद्रकांत लोखंडे यांनी भात शेती, फळझाडे, कडधान्य, भाजीपाला तसेच दुबार पिकांचे यशस्वी उत्पादन करून आधुनिक फरसबाग मॉडेल तयार करून सेंद्रिय विषमुक्त शेती पद्धतीचा अवलंब करत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत बळीराजा शेतकरी सामाजिक संस्थेच्यावतीने त्यांना रघुनाथ पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय पाशिलकर, शिवाजी मुटके, महादेव करे, रणजीत लवटे, रघुनाथ कडू, वर्षा जांभेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीकडे वळवण्यासाठी तसेच नव्या पिढीला शेतीकडे आकर्षित करण्याचा संदेश देण्यात आला.

### महाविद्यालयात नवमतदार नोंदणी अभियान



**तळा** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या, निवडणूक साक्षरता क्लबच्या वतीने मंगळवारी (दि.२०) जानेवारी रोजी नवमतदार नोंदणी करण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांचे १८ वर्ष वय पूर्ण झाले आहे अशा विद्यार्थ्यांना भारत निवडणूक आयोगाचा फॉर्म नमुना ६ देऊन आवश्यक कागदपत्रे सोबत जोडून फॉर्म जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. पदवीच्या प्रथम वर्षात असणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील या मतदार नोंदणीचा अधिक अधिक लाभ घ्यावा असे मत पुरुषोत्तम मुळे यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. दत्ता कुंटेवाड प्रा. भरत चाळके, प्राध्यापिका डॉ. तृप्ती थोरात, सोनम पवार, साक्षी गायकवाड, जान्हवी महाडिक, डॉ. राजाराम थोरात, प्रा. विजय चव्हाण आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३

• ऑफिस कामाकरिता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर , ऑफिस असिस्टंट मुलगा व रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण – ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT. संपर्क – सौ.रेश्मा पाटील पत्ता– अलिबाग ७०८३३९९५३३ वेळ – ११.०० ते५.००

• नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२

• सिव्हील इंजिनियरींग ऑफिसमध्ये कामाकरीता ड्राफ्टसमन (Autocad) पाहिजे. फोन नं. ८३०८२००७७७/७७५८०६४७७३/ ९६६५०६७९१७

• एजन्सीमध्ये कम्प्युटरवर काम करण्यासाठी मुलगी पाहिजे. टॅली–जीएसटी आवश्यक. ९७६५०५०२६३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे खांडस ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील रघुनाथ दामा फाटे हे कैलास परशु ऐनकर या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ८/५ | ०-३५-०० | ०-३३ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२१/०१/२०२६
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## पेण नगरपरिषद, पेण

**फेर ई - निविदा सन २०२५-२०२६**

जा.क्र.पेनप/का.५/आवि/२०२५/१३३३ दिनांक: २०/०१/२०२६

पेण नगरपरिषद,पेण जि. रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ती/संस्था/कंपनी यांजकडुन फेर ई-निविदा मागविणेत येत आहेत.

**कामाचे नाव** - माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पेण नगरपरिषद हद्दीतील FSTP केंद्राजवळ नर्सरी (रोपवाटिका) तयार करणे

सदर कामाची ई-निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी पासून प्रसिद्ध करण्यात येईल.

सही/-
**(श्री.जीवन पाटील)**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

वादी यांचे वकील
ॲड. जयंत ह. चेऊलकर
प्रोसेस जमा निशाणी क्र.नि.६९/ड

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

रे.मु.मुकदमा नं. ४८/२०१५

हेमंत गणपत ... वादी
विरुद्ध
वैजयंती म्हात्रे ... प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी नं. ५/१
श्रीमती संगीता जगदीश शेट्ट्ये
रा.मु.पो. श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सदरील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुद्ध मे. दि. न्याय व स्तर सो यांचे कोर्टात दाखल केला असून या दाव्यामध्ये सुनावणीकरिता पुढील तारीख २३-०२-२०२६ नियुक्त करण्यांत आलेली आहे.

सदरचे दाव्याच्या सुनावणीकामी प्रतिवादी नं.५/१ यांस वरील पत्त्यावर नोटीसा काढल्या असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीचे काम प्रलंबित आहे.

तरी या नोटीसीद्वारे प्रतिवादी नं.५/१ यांस कळविणेत येते की, सदर दाव्याचे सुनावणीची पुढील तारीख २३-०२-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. सदर तारखेस सदर वेळेस तुम्ही स्वत:अगर तुमचे तर्फे तुमचे एजंट, वकील वगैरे यांचे मार्फत हजर रहावे व आपले म्हणणे मांडावे अन्यथा तुम्हांस सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी एकतर्फे घेऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९-०१-२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

अलिबाग
दिनांक :- १९-०१-२०२६

**सही/-** **सही/-**
**कनिष्ठ लिपिक** **अधिक्षक**
**दि. न्याय व.स्तर अलिबाग** **दि. न्याय व.स्तर अलिबाग**
**अलिबाग रायगड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे खानंद, ता. कर्जत जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | जुना सर्व्हे नं.. | नविन सर्व्हे नं./ प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार |
|---|---|---|---|---|
| १) अरूण नारायण नाबर<br>२) अर्चना अरुण नाबर | २५ | ३९/५८ | ३-२९-०० | ३२-९० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालया शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २१/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल:- adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलानी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे -आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्रीम. भिमाबाई खंडू धुळे | ४५/३ | १.६९.४०<br>यापैकी विक्री केलेले क्षेत्र<br>०.४०.०० ( हे.आर.चौ.मी) | १३.०८ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक -श्रीम. भिमाबाई खंडू धुळे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : २१/०१/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता -शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ या करिता श्री. यूसुफ दाऊद एझ्झी यांनी या कार्यालयात दि.२२/१२/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक एम. पी. ५ | १९४ | १६३७९.८० चौ.मी. | यूसुफ दाऊद एझ्झी व इतर | दि.०४/०५/२०४० |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद/नुतनीकरण/हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ.बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता.कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे/पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधिक्षक माथेरान**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.प्रणव शिवनाथ देसाई सौ.पुजा प्रणव देसाई, रा.२१८, शामसुंदर, दुसरा मजला, २७ वा रस्ता, शॉपर्स स्टॉपच्या समोर, बांद्रा (प.), मुंबई, ४०००५०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत -**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| २५/१/अ/८ | ०.४०.०० | ०.२९ | श्रीमती शुभांगी लक्ष्मण शेणॉय |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २१/०१/२०२६.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, "पुष्प विमल" निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. वसंत महादेव वालेकर, मु. कल्पक हौसिंग सोसायटी ई/१०, नाना शंकरशेठ रोड, रायगड ४०२ १०९ यांच्याकडुन खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलोशी, ता.अलिबाग | ४१४ | २-३८-५० | ३२.४२ |

ही मिळकत या नोटीसचा विषय आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून तक्रार अगर हरकत राहील्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांना कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/०१/२०२६

सही/-
**ॲड. पराग मधुकर गुरव**
ता.अलिबाग जि. रायगड
मोबा. ९३२६१३१४८०/८४४६८८०००९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्ताराम महादेव वालेकर, मु. बेलोशी, ता.अलिबाग,जि. रायगड ४०२ २०३ यांच्याकडुन खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलोशी, ता.अलिबाग | ४१५ | १-७५-०० | १४.१९ |

ही मिळकत या नोटीसचा विषय आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून तक्रार अगर हरकत राहील्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांना कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/०१/२०२६

सही/-
**ॲड. पराग मधुकर गुरव**
ता.अलिबाग जि. रायगड
मोबा. ९३२६१३१४८०/८४४६८८०००९

## जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ या करिता ट्रस्टीज ऑफ हायनेस डो. सैद्दीना ताहेर सैफुद्दीन मेत्रा रिअव्ह फॉन्डेशन यांच्या तर्फे श्री.अलीकयानमोइज नूरुद्दीन यांनी या कार्यालयात दि. २४/१२/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता.कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक एम. पी. २२८ | ११७ | ६५७.७० चौ.मी | ट्रस्टीज ऑफ हायनेस डो. सैद्दीना ताहेर सैफुद्दीन मेत्रा रिअव्ह फॉन्डेशन. | ३१/०७/२०२८ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद/नुतनीकरण /हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ. बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे /पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधिक्षक माथेरान**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल रमेश शांताराम कलव यांच्या मालकीचा मौजे वरसोली, ता.अलिबाग स.नं. १८४ हिस्सा नं.४ब३ बिनशेती प्लॉट नं. ४ क्षेत्र ३०० चौ.मी. आकार रू. ६.०० हा आहे. सदर बिनशेती जमीन मिळकत ही आमच्या अशिल यांनी दिनांक १७/०३/२००७ रोजी श्री.मंगेश शंकर भगत यांच्याकडून खरेदीखताने विकत घेतली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील परिशिष्टात नमुद केलेले आहे. सदर मुळ खरेदीखत हे आमच्या अशिलांकडून अलिबाग शहरात प्रवासा दरम्यान दिनांक ०३/०१/२०२६ रोजी हरविले आहे. सदर हरविलेल्या नोंदणीकृत दस्ताची अलिबाग पोलीस स्टेशन येथे दिनांक १७/०१/२०२६ रोजी तक्रार केली आहे. मात्र तरी देखील वर नमुद केलेल्या मिळकतीवर खालील परिशिष्टात नमुद केलेल्या खरेदीखताच्या मुळ दस्ताच्या आधारे कोणाचाही विक्री गहाण दान बोजा बक्षिस लिज लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरचा मुळ दस्त त्यांच्या ताब्यात असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात कळवावी.

**परिशिष्ट**

दिनांक १७/०३/२००७ रोजीचा दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील दस्त क्रं. अलब/१३६३/२००७ कडे नोंदविण्यात आलेला आहे. लिहून घेणार रमेश शांताराम कलव व लिहून देणार श्री. मंगेश शंकर भगत यांच्यामध्ये झालेला मौजे वरसोली, ता. अलिबाग स.नं. १८४ हिस्सा नं. ४ब३ बिनशेती प्लॉट नं. ४ क्षेत्र ३०० चौ.मी. आकार रू. ६.०० या मिळकती संदर्भातील खरेदीखताचा मूळ दस्त. हा या नोटीसचा विषय आहे.

अलिबाग
दि.२१/०१/२०२६

सही /-
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम
हॉटेलच्या वर जिल्हा
न्यायालयासमोर, अलिबाग
रायगड, मो.नं.९२७१७७५२७७

## जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ या करिता दावत ए हदिया यांच्या तर्फे श्री. अदनान शब्बीर वोहरा यांनी या कार्यालयात दि.२४/१२/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक एम. पी.२१३ | ४५ | १४१६.४० चौ.मी. | दावत ए हदिया | दि.०४/०५/२०४० |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद / नुतनीकरण /हस्तांतरण /भोगवटादार वर्ग १ इ. बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे / पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधिक्षक माथेरान**


सिडको
शहरांचे शिल्पकार


## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशोलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड – द्रोणागिरी** | | | | |
| १ | **द्रोणागिरी ११६४** | पाणजे ५०/ ८६-८७ | ८/१४<br>१२/३६<br>१५/३८<br>२२/१३<br>२३/१६<br>२३/१९<br>३०/२५<br>३२/१२<br>३३/१८<br>३३/२४<br>९/२०<br>९/२५<br>११/६<br>१५/११<br>१५/३२<br>१९/३६<br>२०/१४<br>३४/१०<br>३४/१६ | ०-१०-०<br>०-०९-०<br>०-१९-०<br>०-०५-१<br>०-१०-०<br>०-०२-३<br>०-११-०<br>०-०१-५<br>०-०५-१<br>०-०७-१<br>०-०७-०<br>०-०८-०<br>०-०३-६<br>०-०५-०<br>०-०२-५<br>०-०४-०<br>०-०३-०<br>०-०१-०<br>०-०१-० | ९०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी, सेक्टर ४८, भूखंड क्र. ९२, क्षेत्र ९०० चौ.मी. | निरंक | निरंक |
| | | डोंगरी ६१/१११ | २०/१७अ<br>२१/८<br>२७/३ | ०-०४-५<br>०-११-०<br>०-०७-० | | | | |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **१-३७-७** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निर्दर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करावयाचे ठिकाण :** अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण),
सिडको भवन, तळ मजला, १२.५०% भूमि विभाग,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/४६८/२०२५-२६**

## जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ या करिता दावत ए हदिया डॉ सैयदना मोहम्मद बुहानुद्दीन साहेब यांच्या तर्फे श्री.अदनान शब्बीर वोहरा यांनी या कार्यालयात दि. २४/१२/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक एम. पी.१९९ | ३१ | १७७०.५० चौ. मी. | दावत ए हदिया डॉ सैयदना मोहम्मद बुहानुद्दीन साहेब | दि.०९/०७/२०४१ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद/नुतनीकरण/हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ.बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे/ पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधिक्षक माथेरान**

## जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ या करिता दावत इ हदियाह ट्रस्ट मुंबई यांच्या तर्फे श्री. अदनान शब्बीर वोहरा यांनी या कार्यालयात दि. २४/१२/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान भूखंड क्रमांक एम. पी.४७ | ३० | १६५९२.१० चौ.मी. | दावत इ हदियाह ट्रस्ट मुंबई. | ३१/०७/२०२८ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद/ नुतनीकरण /हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ. बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे/पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधिक्षक माथेरान**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री कृष्णा नारायण पाटील रा. गागोदे बुद्रुक पोस्ट-गागोदे, तालुका-पेण, जिल्हा-रायगड याचकडून रजिस्टर्ड खरेदी खताने कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**-जिल्हा रायगड तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-गागोदे बुद्रुक, मौजे गागोदे बुद्रुक येथील गट नं. २५८/अ एकुण क्षेत्र ०-७४-९० हे.आर.चौ.मी. आकार रु.१६-७५ पैसे या जमिनीपैकी श्री.कृष्णा नारायण पाटील यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील ०-३७-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालक यांनी जमिन विकत घेणार यांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १० (दहा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास वरील जमिन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा कायदेशीर हक्क अगर हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील जमिनीचे विद्यमान मालकाबरोबर खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २१/०१/२०२६.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

# भारताच्या फुलराणीकडून निवृत्तीची घोषणा!



## सायना नेहवालचा मोठा निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिग्गज बॅटमिंटन खेळाडू भारताची फुलराणी सायना नेहवाल हिने मोठा निर्णय घेतला आहे. तिने बॅडमिंटनमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. याबाबत सायनाने एका पॉडकास्टमध्ये सांगितले आहे. तिने सांगितले की, तिच्या गुडघ्यामध्ये असलेल्या वेदनेमुळे तिच्यासाठी आता खेळणे शक्य नाही. तिने शेवटची स्पर्धा २०२३ मध्ये सिंगापूर ओपन खेळली होती. त्याआधी सायनाने २०१२ मध्ये ऑलिम्पिक पदक जिंकले होते.

सायना नेहवालने पॉडकास्टमध्ये सांगितले की, मी दोन वर्षांपूर्वीच खेळणे बंद केले आहे. मी माझ्या अटींवर खेळायला सुरुवात केली होती आणि माझ्या अटींवरच खेळणे सोडले आहे. त्यामुळे मला निवृत्तीची घोषणा करणे गरजेचे वाटले नाही. सायनाच्या मते तिच्या गुडघ्यातील कार्टिलेज पूर्ण खराब झाले असून तिला संधिवात झाला आहे. ती म्हणाली, जेव्हा तुम्ही खेळू शकत नाही, तेव्हा तुम्ही थांबायला हवे. मी पहिल्या ८-९ तास सराव करायची, परंतु आता माझे गुडघे १-२ तासातच उत्तर देऊन टाकतात. त्यानंतर सुज येते. त्यामुळे मी विचार केला की आता खूप झाले. मी माझी कारकिर्दी आणखी ताणू शकत नाही.

सायना नेहवालला २०१६ ऑलिम्पिकदरम्यान झालेल्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे मोठा फटका बसला होता. परंतु, त्यानंतर तिने दमदार पुनरागमन करत २०१७ वर्ल्ड चॅम्पियनशीपमध्ये कांस्य आणि २०१८ राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते. मात्र, त्यानंतर तिला सातत्याने गुडघ्याच्या दुखापतीचा सामना करावा लागला होता. सायनाने २०२४ मध्येच जाहीरपणे तिला संधिवात असल्याचे सांगितले होते. सायनाने जेव्हा २०१२ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते, तेव्हा ती ऑलिम्पिक पदक जिंकणारी भारताची पहिली बॅडमिंटन खेळाडू ठरली होती. तिने तीनवेळा ऑलिम्पिक स्पर्धा खेळली आहे. ती २००८ मध्ये जेव्हा वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशीप जिंकली होती, तेव्हा प्रकाशझोतात आली होती. त्यावर्षी ती पहिल्यांदा ऑलिम्पिक खेळली होती. २००९ मध्ये तिने सुपर सिरीजही जिंकली होती. २०१० साली तिने राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली होती. सायनाचा २००९ मध्ये अर्जुन पुरस्काराने आणि २०१० मध्ये राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला आहे.

## निवडक

### क्रिकेटच्या तिकिटांचा काळाबाजार

**नागपूर :** भारत-न्यूझीलंड टी-२० क्रिकेट सामन्याच्या तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या १९ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्याकडून तिकिटे व मोबाईलसह २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मोहम्मद आदीब शेख ईजाज (१९) असे तिकिटांचे काळाबाजर करणाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हेशाखेचे पथक रविवारी (दि.१८) रात्रीच्या सुमारास गस्तीवर होते. तेव्हाच पोलिसांना माहिती मिळाली की, या भागातील व्हीसीए स्टेडियमच्या बाजूला हेरिटेज हॉटेलजवळ एक तरुण टी-२० सामन्याची तिकिटे चढ्या दराने विकत आहे. या आधारावर पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. यावेळी संशयास्पदरित्या फिरत असलेल्या मोहम्मद आदीब शेख ईजाज याला ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याच्या खिशात प्रत्येकी ६५० रुपयांची क्रिकेट सामन्याची २ तिकिटे आढळली. चौकशीत आरोपीने ही तिकिटे प्रत्येकी २ हजार ५०० रुपयांना विकण्याचा प्रयत्न करत असल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून तिकिटे व मोबाईल असा एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

### गोशिन रियु कराटेची चमकदार कामगिरी



**उरण :** अलिबाग येथे २६वी शितोरियू कराटे डो असोसिएशनची ऑल इंडिया ओपन चॅम्पियन कराटे स्पर्धा संपन्न झाली. त्यामध्ये विविध वयोगटांमध्ये गोशीन रियु कराटे असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटात सहभाग घेऊन चमकदार कामगिरी केली. यावेळी मनस्वी ठाकूर याने २ सुवर्णपदक, स्वरा म्हात्रे हिने १ सुवर्णपदक व १ रौप्यपदक तर वेदा पाटील, श्रुजा गावं, साक्षी पाटील आणि अमिषा घरत यांनी कांस्यपटाकाची कमाई केली आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतातून ९५० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सिहान राजू कोळी, गोपाळ म्हात्रे, परेश पावस्कर, अमिषा खरात, राकेश म्हात्रे, भूषण म्हात्रे यांनी केले. ही स्पर्धा सिहान राहुल तावडे व रागिनी तावडे यांनी भरविली होती.

### शार्दूल भोईरचा विक्रमी निर्धार

**शिहू :** जांभूळटेप गावातील ११ वर्षीय शार्दूल भोईर याने ऐतिहासिक सागरी पोहण्याचा निर्धार करून २४ किलोमीटरचे अंतर ६ तास २१ मिनिट २१ सेकंदात पार केला आहे. शार्दूलने




सोमवारी (दि.१९) रात्री २:२० वाजता करंजा जेट्टी ते गेट वे ऑफ इंडिया हे अंतर पोहण्यास सुरवात केली. त्याच्या मेहनतीने व जिद्दीने त्याने कुठेही न थांबता ६ तास २१ मिनिट २१ सेकंदात हे अंतर पार केले. शार्दूल हा उरण एज्यूकेशन सोसायटी इयत्ता ६वीचा विद्यार्थी आहे. त्याने वयाच्या ९व्या वर्षापासून पोहण्यास सुरवात केली आहे. त्यासाठी त्याला आई जागृती भोईर, वडील अमोल भोईर, प्रशिक्षक इंटरनॅशनल स्विमर संतोष पाटील, हितेश भोईर व सुनील पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे तो हे अंतर सहजरित्या पार करू शकला. गेट वे ऑफ इंडियाला पोहचल्यावर सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, व मान्यवरांकडून शार्दूलचे जंगी स्वागत करण्यात आले. त्याच्या या धाडसी मोहिमेबद्दल रायगड जिल्हासह सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

### पाकिस्तान बोर्डाचे आयसीसीशी वैर?

**नवी दिल्ली :** पुरूषांचा टी-२० विश्वचषक अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपला आहे. असे असताना आशियातील २ संघांच्या मागण्याच काही कमी होताना दिसत नाही. त्यात पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने यंदा बांग्लादेश क्रिकेट बोर्डचे समर्थन करताना भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद यांच्याशी वैर घेतले आहे. बांग्लादेशाचे आगामी टी-२० विश्वचषकाचे साखळी सामने भारतात होणार आहेत. त्यासाठी त्यांच्या खेळाडूंसोबत बोर्डनेही भारतात खेळण्यास मनाई केली आहे. त्याआधी त्यांनी आयसीसीला त्यांचे सामने श्रीलंकेत हलवण्यात सांगितले किंवा आयर्लंडसोबत गट बदलण्याचीही मागणी केली. आयसीसीच्या आधी आयर्लंडनेच याला मनाई करत त्यांचे सामने ठरलेल्या वेळापत्रकानुसार होणार असे स्पष्ट केले आहे. तसेच, आयसीसीने बांग्लादेशाला भारतात खेळण्यास सुरक्षेबाबत कोणतीच काळजी नाही. त्यासाठी आयसीसीने त्यांना भारतात खेळण्याचा अंतिम निर्णयाबाबत २१ जानेवारीपर्यत विचार करण्याची मुदत दिली आहे. त्यांच्या मध्येच पाकिस्तानने त्यांची साथ दिली आहे. बांग्लादेशची मागणी पूर्ण नाही झाली तर पाकिस्तानही टी-२० विश्वचषकातून माघार घेईल, अशी भुमिका पाकिस्तानने मांडली आहे.

# कोल्हापुरकर सृष्टीने मारले ‘केसरी’ मैदान

## हुतात्मा स्मारकात रंगला पहिला जिजाऊ महिलांच्या कुस्त्यांचा थरार



### वजन गटनिहाय विजेते, उपविजेती

- २२ किलो : रुचा पाटील (पन्हाळा) व सई कोंडावळे (खामकरवाडी)
- २५ किलो : आराध्या तांबे (वाखारी) व भाग्यश्री वायदंडे (सासुर्वे)
- ३० किलो (१५ वर्षांखालील) : समृद्धी सावंत व श्रावणी शिंदे
- ३० किलो (११ वर्षांखालील) : सृष्टी राजीवडे व स्वरा कदम
- ३५ किलो : शामल चव्हाण (म्हसवड) व वैष्णवी कोळी (इंदापूर)
- ४० किलो : वैष्णवी ढेकळे (वाखरी) व जान्हवी माने (शिरढोण)
- ४५ किलो : अमृता शिंदे ( बारामती) व भारती पाटेकर (बेडग)
- ५० किलो : तनुजा माळी (बेडग) व अनुष्का हास्पे (सोमंथळी)
- ६० किलो : साक्षी पाटील (चाफळ) व साक्षी धुमाळ (मरडे)
- ६५ किलो : ऋतुजा गाडवे (पुणे) व शर्वरी राठोड (सातारा)

**। कोरेगाव । प्रतिनिधी ।**

कोरेगाव येथील हुतात्मा स्मारकात जिजाऊ केसरी महिलांच्या कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात कुस्त्यांच्या मैदानातील खुल्या गटात कोल्हापूरच्या सृष्टी भोसलेने कऱ्हाडच्या वेदांतिका पवारवर मात करत प्रथम क्रमांक मिळवत जिजाऊ केसरी किताब तथा मानाची गदा देखील पटकावली आहे.

माँ साहेब जिजाऊ जयंतीच्या निमित्ताने जिजाऊ महोत्सव समितीच्यावतीने सातारा जिल्हा कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने प्रथमच जिजाऊ केसरी महिला कुस्त्यांचे मैदान आयोजित केले होते. आंतरराष्ट्रीय पैलवान भरत जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त कोमल गोळे यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या या मैदानात २२ ते ६५ किलोपर्यंत १० वजन गट व १ खुला अशा ११ गटात कुस्त्या पार पडल्या. या स्पर्धेत साताऱ्यासह पुणे, सांगली, कोल्हापूर व सोलापूर आदी जिल्ह्यांतील सुमारे दीडशेवर महिला पैलवान सहभागी झाल्या होत्या.

यावेळी मैदानातील खुली व प्रथम क्रमांकाची कुस्ती सृष्टी भोसले व वेदांतिका पवार यांच्यातील कुस्ती चुरशीने झाली. गुणांच्या जोरावर तृप्ती भोसलेने वेदांतिका पवारवर मात करत अर्चना बर्गे यांनी पुरस्कृत केलेले ११ हजार रुपये रोख बक्षीस व जिजाऊ केसरीची गदा पटकावली. तर, उपविजेत्या वेदांतिका पवार हिला ७ हजार रुपये आणि तृतीय हिंदवी घोरपडे (इंदापूर) हिला ३ हजार रुपये रोख बक्षीस व चषक प्रदान करण्यात आली. सर्व विजेत्यांना कोरेगाव इनरव्हील क्लब व रमेश उबाळे यांच्यावतीने पारितोषिके देण्यात आले. यावेळी मैदानात पंच म्हणून राजेंद्र कणसे, जितेंद्र कणसे, अमर कणसे, ओंकार कणसे, सागर काळे, अरविंद निकम, अनिकेत काळे, प्रेम किर्दत यांनी काम पाहिले. कुस्त्यांचे समालोचन रोहन केंजळे यांनी केले. मैदानाच्या यशस्वितेसाठी जिजाऊ महोत्सव समिती व कुस्तीप्रेमी, शौकिनांनी परिश्रम घेतले.

# बंगळुरूचा गुजरातवर ‘रॉयल’ विजय

## सलग पाच विजयांसह पात्र फेरीत

**। वडोदरा । वृत्तसंस्था ।**

महिला प्रीमिअर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात जायंट्सवर विजय मिळवत गुणतालिकेतील आपले वर्चस्व कायम राखले आहे. बंगळुरूने वडोदरा येथील सामन्यात गुजरातवर ६१ धावांनी विजयाची नोंद केली आहे. सलग ५ विजयांसह प्ले ऑफमधील आपले स्थान देखील बंगळुरूने पक्के केले आहे.



बंगळुरूने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद १७८ धावा केल्या. यावेळी सलामीच्या जोडीला पुन्हा अपयश आले. ग्रेस हॅरिस व जॉर्जिया व्हॉल या दोघीही १ धावेवर बाद झाल्या. कर्णधार स्मृती मानधना २६ धावांवर पायचीत झाली. परंतु, गौतमी नाईक आणि रिचा घोष यांनी संघाला स्थिरता दिली. या दोघींनी चौथ्या बळीसाठी ६७ धावांची भागीदारी केली. रिचा २० चेंडूंत २७ धावांवर माघारी परतली. गौतमीनेही ५५ चेंडूंत ७३ धावा केल्या. राधा यादवने ८ चेंडूंत १७ धावांचे योगदान दिले. यावेळी गुजरातच्या काश्वी गौतम व ॲश गार्डनर यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

मात्र, बंगळुरूने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना गुजरातला ८ बाद ११७ धावाच करता आल्या. सायली सातघरेने गुजरातच्या दोन्ही सलामीच्या खेळाडूंना माघारी पाठवले. त्यांचे ३ फलंदाज ५ धावांत तंबूत परतले होते. कर्णधार गार्डनरने ५४ धावांची खेळी करून संघर्ष केला. यावेळी बंगळुरूच्या सायलीने ३, तर नॅडीने डे क्लर्कने २ बळी घेतले.

## एका दिवसात दोनदा महामुकाबला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट चाहत्यांसाठी फेब्रुवारी महिना खूपच रोमांचक ठरणार असून एकाच दिवशी भारत विरूद्ध पाकिस्तान यांच्यात दोन महामुकाबले होणार आहेत. १५ फेब्रुवारी रोजी पुरूष टी-२० विश्वचषक आणि महिला आशिया चषक राइजिंग स्टार्समध्ये भारत विरूद्ध पाकिस्तानच्या संघामधील सामना होणार आहे. पहिला भारताचा सामना पाकिस्तानशी कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये संध्याकाळी ७ वाजता पार पडणार आहे. त्याच दिवशी थायलंडच्या राजधानीत वुमेन्स एशिया कप राइजिंग स्टार्समध्येही भारत विरूद्ध पाकिस्तानच्या महिला संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना सकाळी १२:३० वाजता सुरू होणार आहे.






# मास्टर्स स्पर्धेमध्ये भारताचा कस

**। जकार्ता । वृत्तसंस्था ।**

मागील आठवड्यात भारतात पार पडलेल्या इंडिया ओपन या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडूंना निराशेचा सामना करावा लागला होता. त्यानंतर आता दि.२० जानेवारीपासून जकार्ता येथे सुरू होत असलेल्या इंडोनेशिया मास्टर्समध्ये पुन्हा एकदा त्यांचा कस लागणार आहे. इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडूंना आव्हानात्मक ड्रॉचा सामना करावा लागणार आहे.

इंडिया ओपन स्पर्धेमध्ये लक्ष्य सेन वगळता भारताच्या इतर खेळाडूंना ठसा उमटवता आलेला नाही. अर्थातच लक्ष्य सेन यालाही उपांत्यपूर्व फेरीपर्यंतच मजल मारता आली होती. आता लक्ष्य सेन याच्यासमोर इंडोनेशिया मास्टर्स स्पर्धेतील सलामीच्या लढतीत सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेह या खेळाडूचे आव्हान असणार आहे. तसेच, एच. एस. प्रणोय याला पॅरिस ऑलिंपिकमधील कांस्यपदक विजेत्या मलेशियाच्या ली झी जिया याचा सामना करावयाचा आहे.

माजी पहिल्या क्रमांकावरील खेळाडू किदांबी श्रीकांत याने मागील वर्षी मलेशिया मास्टर्स व सय्यद मोदी या दोन स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता. आता इंडोनेशिया स्पर्धेतील पहिल्या फेरीत त्याला जपानच्या कोकी वातानबे याच्याशी दोन हात करावे लागणार आहेत. भारताचा तरुण मानेपल्ली व जपानचा युशी तनाका यांच्यामध्येही लढत पार पडणार आहे. इंडोनेशियाच्या जॉनाथन ख्रिस्ती याचे आव्हान आयुष शेट्टी या भारतीय युवा खेळाडूला परतवून लावावे लागणार आहे.

# भारताचा स्फोटक फलंदाज मैदानात परणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा सध्या संघ सात्यत्याने टी-२० मालिका जिंकत आहे. तसेच, आगामी टी-२० विश्वचषक भारत आणि श्रीलंकेत होणार असल्याने भारताला विजयाचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. अशातच भारतासाठी आनंदाची बातमी पुढे येत आहे. भारताचा स्टार फलंदाज जो दुखापतीमुळे काही काळ मैदानाबाहेर होता. तो आता दुखापतीतून सावरत असून लवकरच संघाशी जोडला जाणार आहे.

भारताचा स्फोटक फलंदाज तिलक वर्मा लवकरच संघात परतणार असल्याचे वृत्त समोर येत आहे. त्याच्या परतण्याने भारताच्या क्रमांक तीन फलंदाजीची अडचण दूर होईल. त्याला दुखापतीमुळे न्यूझीलंड विरुद्धच्या टी मालिकेतील काही सामन्यांना मुकावे लागले आहे. यासाठी त्याच्याजागी संघात श्रेयस अय्यरला संधी दिली आहे. आता तिलकने सराव सुरू केला आहे. त्यामुळे तो न्यूझीलंड विरुद्धच्या चौथ्या सामन्यात संघात परतू शकतो. मिळालेल्या माहितीनुसार, तिलक सध्या दुखापतीतून सावरत आहे. त्याला कोणत्याही प्रकारचे दुखणे नाही. त्यामुळे तो बीसीसीआयच्या बंगळुरूमधील सेंटर ऑफ एक्सिलेंसला (सीओई) जाणार आहे. येथे त्याची फिटनेस चाचणी होणार आहे. यावरून लवकरच त्याला संघाकडून खेळण्यासाठी हिरवा कंदिल मिळणार आहे.

## तेलंगणातील क्रीडा संकुलात थरार रंगणार | राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता संघ जाहीर

# पुणेकर रेखा सावंतकडे महाराष्ट्राची धुरा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

७२ व्या महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा दि.२७ ते ३० जानेवारी या कालावधीत तेलंगणा येथील गच्ची बोवली बंदिस्त क्रीडा संकुलातात पार पडणार आहेत. त्यासाठी महाराष्ट्राचा संघ राज्य संघटनेचे प्रभारी अध्यक्ष गजानन कीर्तीकर यांच्या मान्यतेने व मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आला. यावेळी पुणे ग्रामीणच्या रेखा सावंतकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा, तर मुंबई उपनगर पश्चिमच्या कोमल देवकरकडे सहाय्यक नेतृत्व सोपविण्यात आले आहे.

मुंबई उपनगर कबड्डी असो. व स्वस्तिक क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली पूर्व येथील




### निवडण्यात आलेला संघ

रेखा सावंत-संघनायिका (पुणे ग्रामीण), कोमल देवकर-उपसंघनायिका (मुंबई उपनगर पश्चिम), प्रतीक्षा तांडेल (मुंबई शहर पश्चिम), समृद्धी मोहिते, याशिका पुजारी (दोघी मुंबई उपनगर पूर्व), पौर्णिमा जेधे, साक्षी सावंत (दोघी मुंबई शहर पूर्व), ज्युली मिस्किटा, संजना भोईर (दोघी पालघर), समरिन बुरोंडकर (रत्नागिरी), गार्गी साखरे (सातारा), आम्रपाली गलांडे (पुणे शहर), निकिता पडवळ (पुणे ग्रामीण), माधुरी गवंडी-ठाणे शहर. राखीव खेळाडू : हर्षा शेट्टी, अंकिता चव्हाण (दोन्ही पुणे शहर), तसलिन बुरोंडकर (रत्नागिरी), प्रशिक्षिका: मेघाली म्हसकर.

सुवर्णा संतोष केणे गार्डन येथे महाराष्ट्र संघाचे सराव शिबीर प्रशिक्षिका मेघाली म्हसकर-कोरगावकर यांच्या मार्गदर्शना खाली सुरू आहे. या संघासोबत फिजिओ म्हणून सलोनी संकपाळ यांची, तर फिटनेस ट्रेनर म्हणून सायली नागवेकर हिची नियुक्ती करण्यात आली आहे. संघाच्या निवडीत पारदर्शकता यावी म्हणून या निवडीचे थेट प्रक्षेपण करण्यात येऊन ते कबड्डी रसिकांना दाखविण्यात आले. या संघाची निवड मीनल पालांडे, वीणा शेलटकर व मेघाली कोरगावकर यांच्या निवड समितीने केली. या तिन्ही सदस्य शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू आहेत. हा संघ सोमवारी (दि.२६) पहाटे तपोवन एक्स्प्रेसने स्पर्धेकरिता रवाना होणार आहे.

## मुंबईची महत्त्वाची खेळाडू दुखापतग्रस्त

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महिला प्रीमीयर लिगमध्ये मुंबई इंडिनन्सची कामगिरी काहीशी निराशाजनक राहिली आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात मुंबईने आतापर्यंत पाच सामने खेळले आहेत. मात्र, दोनच सामन्यांमध्ये त्यांना विजय मिळवता आला आहे. संघ सध्या गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर असून प्ले ऑफमध्ये धडक मारण्यासाठी संघाला दमदार पुनरागमन करावं लागणार आहे. अशातच मुंबईची विस्फोटक फलंदाज गुणालन कमलिनी दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाली आहे. तिच्याजागी २२ वर्षीय नवख्या खेळाडूची संघात वर्णी लागली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)